म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. २९८

# कारपरीक्षण

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. निबंध नं. ९९
ता.
ठाणे.

निबंध ०३१४

REFBK-0005231

गो. म. जोशी

# धर्मशास्त्रविचारपरीक्षण

अर्थात्

प्रो. पां. वा. काणे, एम्. ए., एल्एल्. एम्.

यांच्या पुस्तकाचें आमूलाग्र खंडन.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं. निबंध. ८८३
ता. २१।७।५३
ठाणे.

लेखक

गो. म. जोशी

५२३१
मराठी ग्रंथ संग्रहालय
५२३१
ठाणे.
REFBK-0005231

गुरुपौर्णिमा, शके १८५७

किंमत १० आणे

लक्ष्मण नारायण चापेकर यांनीं ' आर्यसंस्कृति मुद्रणालय ' टिळकरस्ता,
पुणें २ येथें छापून पंडित वि. म. जोशी यांनीं घ.नं. ६०४ (२)
सदाशिव पेठ, पुणें २ येथें प्रसिद्ध केलें.

# प्रस्तावना

आम्हीं हिंदूंचें समाजरचनाशास्त्र नांवाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केल्याला एक वर्ष होत आलें. या ग्रंथामध्यें हिंदूंची समाजरचना आजपर्यंत ज्या कांहीं समाजरचना होऊन गेल्या आणि आज आहेत त्या सर्वांमध्यें श्रेष्ठ आहे असें दाखविलें. मानवी प्रयत्नाला समाज जितका निर्दोष करणें शक्य आहे तितका हा समाज आहे. परंतु आपली समाजरचना बरोबर आहे असें सांगणें म्हणजे समाजाची कांहींतरी बदनामी आहे असें बऱ्याच लोकांना वाटून त्या ग्रंथावर परीक्षणें, हल्ले, टीकालेख वगैरे सुरू झाले आणि अजूनही संपले नाहींत.

मानवाला अन्न, स्त्री, स्पर्धा वगैरे कांहीं प्राथमिक गरजा असतात. त्यांतील कोणतीहि गरज घेतली तरी जेथें जेथें मानव आहे तेथें तेथें तिचें अस्तित्व असणारच. त्यामुळें त्यांतील कोणतीहि प्रधान मानून विचार केल्यास मानवी हालचाली त्या तत्त्वाला समांतर असल्याचें कांहींतरी ओढाताण करून सहज दाखवितां येतें. कोणी असें दाखवितील कीं, समाजांच्या हालचाली अर्थप्रधान आहेत ( Marx ). दुसरे असें दाखवितील कीं, समाजांचे उदयास्त त्या समाजांच्या लैंगिक नीतीवर अवलंबून आहेत ( Sex regulation and human behaviour ). तिसरे असें म्हणतील जागतिक उत्क्रांतीचा एक भाग म्हणून मानवी समाजाचें हित स्पर्धेत आहे ( Darwin, Adam Smith ). कोणी म्हणतील कीं, सर्व समाजांतील नीतियुक्तता हा नुसता अनुकरणाचाच परीणाम आहे ( Gabriel Tarde ). असो. अशा तऱ्हेनें एक एक अंग उचलून सर्व मानवी हालचाली त्याशीं समांतर दाखविण्याचा प्रयत्न केल्यास सरासरी पंधरा तऱ्हेनें दाखवितां येते. या सर्वांचा समाजरचनेशीं संबंध असला तरी एक एक घटना मुख्य कारण किंवा एकटेंच कारण होऊं शकत नाहीं. या सर्वांचा आम्हीं आपल्या ग्रंथांत प्रकृति ( nature ) आणि संस्कार ( nurture )

असे गट पाडून प्रकृति प्रधान आणि संस्कार दुय्यम असे धरून विचार केला आहे.

ग्रंथावर आलेले लेख आणि परीक्षणें वाचून मात्र बुद्धि गुंग होऊन जाते. किर्लोस्कर मासिकांत रा. वैद्य म्हणतात कीं, जातिघटना समर्थनार्थ मी ( १ ) आनुवंश ( २ ) श्रमविभाग ( ३ ) मध्यवर्ति प्रबल सत्तेचा अभाव व ( ४ ) सर्वसाधारण समाजांत अज्ञान हीं चार तत्वें घेतलीं आहेत. केसरीमध्यें श्री. केळकर म्हणतात, मी फक्त अनुवंशाचा आणि त्यांतल्या त्यांत गाल्टनच्या पद्धतीचा आधार घेतला आहे. किर्लोस्कर मासिकांत श्री. श्रीखंडे म्हणतात मी लामार्कच्या अनुवंश पद्धतीवर जातिसंस्थेचें समर्थन करतों. प्रो. काणे म्हणतात कीं, मी अनुवंशाचें तत्त्व सारसर्वस्व मानलें आहे. हीं चारही मतें वाचलीं तर फक्त एकट्या वैद्यांनीं ग्रंथ समजावून घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. बाकीच्यांनीं कांहींतरी ग्रंथांत नसलेलें आपल्याच डोक्यांतील तत्त्व गृहीत धरून टीका करण्याचा उपक्रम केलेला आहे. अत्यंत आश्चर्याची गोष्ट अशी कीं, त्रोटक कां होईना आमची भूमिका मांडण्याचा प्रयत्न श्री. वैद्य यांच्याशिवाय दुसऱ्या कोणीहि केला नाहीं.

कोणत्याही विषयामध्यें प्रथमतः लागूं आणि गैरलागूं गोष्टींचा निर्णय करून त्यांचा परामर्श कोणत्या पद्धतीनें घ्यावयाचा हें ठरवावें लागतें. त्याप्रमाणें मी प्रथमतः संस्कृतीचे पर्याय, त्यांच्या संघर्षाचे अंतिम परीणाम वगैरेंची चर्चा केली आहे. समाजांतील सुखदुःखें आणि श्रेष्ठता मोजण्याची कांहीं गमकें दिलीं आहेत. कोणत्याही मुद्याची चर्चा करतांना त्यांतील ध्येय सांगून, त्याचें मोजमाप देऊन हिताहिताची चर्चा केलेली आहे. लोकसंख्यांचा संख्या व गुण या दोनही दृष्टीनें अद्ययावत् शास्त्रांत विचार कसा करतात तेंही सांगितलें आहे. परंतु यांपैकीं एकासही कोणाही लेखकानें ओझरता स्पर्श देखील केला नाहीं. उदाहरणार्थ, लोकसंख्येमध्यें आत्महत्यांचें प्रमाण वाढत जाणें हें समाजस्थिति बिघडत जाण्याचें लक्षण आहे असें एक गमक सांगितलें. आमच्या टिकाकारांनीं हें गमक चूक आहे असें तरी एक दाखविलें पाहिजे अगर तें गमक लावून हिंदुसमाज इतर समाजापेक्षां हीन आहे असें तरी दाखविलें पाहिजे. परंतु ती गोष्ट कोणीच

टीकाकार करीत नाहींत, तोंपर्यंत आम्हांला आमचीं मतें अभेद्य वाटल्यास त्याबद्दल आमच्याकडे काय दोष येतो नें आमच्या मुळींच लक्षांत येत नाहीं.

उपर्युक्त चार टीकाकारांपैकी श्री. वैद्य आणि केळकर यांना आम्ही ताबडतोब उत्तरें दिलींच आहे. तरी श्री. केळकर यांचें समाधान झालेलें दिसलें नाहीं. त्यांनीं संकराच्या समर्थनार्थ म्हणून पुन्हां सर फ्राइंडर्स पेट्री याचा एक उतारा दिला आहे. परंतु जुन्या संस्कृतींचा पुनरुद्धार करण्याकरितां एकादा नवीन वंश ( new stock ) यावा लागतो असें त्याचें म्हणणें आहे. परंतु नवीन वंश आणणें म्हणजे आंतर-जाती-विवाह असा अर्थ कसा निघेल हें रा. केळकर एकटेच जाणूं शकतात. अशा तऱ्हेनें वादविवाद करणाराला काय म्हणावें हेंच समजत नाहीं.

आतां सध्यां प्रचलित टीकाकार म्हणजे चित्रमयजगतांतून चालू असलेली श्री. पु. ग. सहस्रबुद्धे यांची लेखमाला, महाराष्ट्र-शारदेंतील मिरजेचे श्री. महादेवभटजी दिवेकर यांचे लेख, राजशेखर नांवाच्या लेखकानें नवमतवाद नांवाच्या चोपड्यांत दिलेल्या कोपरखळ्या, इत्यादि हे आहेत. त्यांपैकीं पहिले टीकाकार रा. सहस्रबुद्धे यांना ते ज्या विषयाबद्दल लिहीत आहेत त्या विषयाबद्दल कितपत माहिती आहे हें दाखविणारा एक लेख संपादकाकडे पाठवून दिला होता; परंतु संपादकमहाशयांनीं तो परत पाठवून दिला. आतां ते गृहस्थ संख्या आणि गुणदृष्ट्या लोकसंख्यावर लिहूं लागले आहेत. परंतु लोकसंख्यांचा अभ्यास, त्यांच्या वाढींची अगर घटींची गति मोजण्याचे नियम आतां गणितागत निश्चित झाले आहेत. ते नियम लावून जगांत लोकसंख्या वाढते आहे काय हें दाखवावयास पाहिजे. तो नियम पुढीलप्रमाणें "This leads to a differential equation for the law of the population growth of the form $\frac{dy}{dt}=\frac{y}{x}\left(1-\frac{y}{l}\right)$". यासंबंधीं ज्यांना ज्यास्त माहिती करून घ्यावयाची असेल त्यांनीं रेमंड पर्लेचें 'Studies in human biology' आणि फिशरचें 'Genetical theory of natural selection' पहावें. वरील नियम लावून लोकसंख्या चढावर आहे किंवा उतरणीवर आहे हें पहावयास पाहिजे. त्याबरोबरच लोकसंख्येची संख्यादृष्ट्या वाढ

आणि गुणदृष्ट्या घट ( differential birth rate ) समजण्याकरितां हा नियम प्रत्येक गटाला लावून पहावयास पाहिजे. परंतु आमच्या उपर्युक्त लेखकांना नियम लावून पहाणें तर दूरच परंतु नियम समजण्याची जेथे पंचाईत तेथे या लेखकानें लोकसंख्याच्या प्रश्नावर आपलीं मतें सांगत बसणें हें हिंदुस्थानांत अत्यंत क्षम्य आहे. आम्ही पुन्हां एकदां संपादक-महाशयांना कॉंग्रेसच्या सत्याची शपथ घालून या लेखकाच्या लेखांचे ओळन् ओळ खंडन करण्याकरितां जागा देण्याची विनंती करणार आहोंत. पाहूं काय होईल तें ! ज्याप्रमाणें मानवी लोकसंख्यांच्या वाढीघटीचा नियम वर दिला आहे, त्याप्रमाणें मानवी सुपीकतेचा नियम पुढीलप्रमाणें आहे $v_x = \frac{e^{mx}}{l_x} \times \text{Integral of } e^{mt\,!L\,t\,Bt\,dt}$ आहे. तोही आमच्या इकडील समाजशास्त्रावर लिहिणाऱ्या पंडितांनीं जरूर लावून पहावा.

दुसरे लेखक महादेवभटजी, त्यांना अगदीं झोंपेच्या खोलीसारख्या किरकोळ बाबतींत देखील किती माहिती आहे ते साप्ताहिक सकाळमध्यें लेख लिहून नजरेस आणलेंच आहे. तिसरे श्री. राजशेखर यांनीं पुष्कळशा शास्त्रांचा उल्लेख केला आहे. त्यांतील एकदोन नमुन्याकरितां देतों. ‘ पदार्थांचें पृथक्करण करतां त्यांचें स्वरूप ( Electro-magnetic ) असल्याचें सिद्ध झालें आहे. हा शोध प्रथम फॅरेडे यानें लावला आणि क्लार्क मॅक्सवेल यानें पूर्णत्वाला नेला. म्हणून पदार्थाला निश्चेतन मानणें अज्ञानाचें आहे. यावरूनच पदार्थ व चेतना यांचें अभिन्नत्व प्रस्थापित झालें ’ येथें वापरलेला चेतना शब्द, सजीवाच्या इच्छाशक्तींशीं समानार्थक म्हणून वापरला किंवा काय तें कळत नाहीं. तसा वापरला असल्यास राणा प्रताप आणि अंबरचा मानसिंग हे वेगवेगळ्या तऱ्हेनें कां वागले त्याचीं कारणें Electro-magnetic लेखकांनीं द्यावयास पाहिजेत. दुसरे पदार्थाचें स्वरूप Electro-magnetic आहे असें कोण बरें म्हणत असेल ! फॅरडे, मॅक्सवेल नंतर त्यांच्या पायावर पाय ठेवून हर्डझ, लोरेंट्झ, मायकेलसन, मोर्ले, वगैरेंनीं शोध केले. त्या बाबतींत पदार्थविज्ञानशास्त्रांतील आजचें मत पुढीलप्रमाणें ‘ For the example, *the electro magnetic pro-*

*perties of matter were not attributed to the atoms themselves* but to the ether which surrounds and permeats atoms.' या मक्सवेल–लोरेंट्झ कल्पनेवर पुढें आइन्सटीननें सापेक्षतावादाची कल्पना मांडली. तावडतोब आमच्या लेखकांना वाटूं लागलें जगांत परिस्थितीनिरपेक्ष कांहीं नाहीं असें तो म्हणतो. परंतु तो पुढील प्रमाणें म्हणतो ' The special theory of relativity assumes, on the basis of the above experiments, that the *velocity of light is constant regardless of the motion of the observer* and *shows that the laws of nature* (that is, those of mechanics, light and so on,) *are exactly of the same form when referred either to a system of co-ordinates relative to which ether is at rest or to a system which is moving uniformly with respect to the former* ' The ether, Scientific American Nov. 1934.

याचा अर्थ असा कीं, तुलनेला घेतलेली परिस्थिति स्थिर अगर चर घेतली तरी सृष्टीचे नियम जसेच्या तसेच रहातात. आमचे फरडे लेखक सापेक्षतावाद शब्दाचा जो अर्थ घेतात तो आणि आईनस्टीनचा अर्थ एकच आहे कां ? परंतु लेखक म्हणतात आम्ही वाद तर्कशुद्ध आणि शास्त्रशुद्ध करतो.

दुसरे पहा ' उत्पादन क्रियेंतील साधनें व उत्पादक वर्ग यांच्या परस्पर संबंधांतून समाजाची रहाणी, करणी, विचार आचार, नीतिनियम म्हणजे संस्कृति ठरत असतात. ' उत्पादन क्रियेंतील साधनें कशानें बदलतात असें विचारल्यास मानवी इच्छाशक्ती आणि मन असें म्हणतां येणार नाहीं. तसें म्हटल्यास मानसशास्त्र हा समाजशास्त्राचा पाया ठरेल. परंतु त्यांच्या मतानें तो अपसिद्धांत आहे. म्हणून ते सांगतात भौतिक गरजामुळें असें फरक होतात. मग खरोखर भौतिक स्थितींत समान उत्पादक साधनें व्हावयास पाहिजेत. परंतु मानवी इतिहासांत तसें दिसत नाहीं ' Whilst the people of the grass lands of Africa and America were hunting wild animals until recently *the inhabitants of similar regions* in Europe and Asia had for thousands of years been keeping flocks of sheeps, goats and cattles.' World

by Dudley Stamp हें असें कां होतें, तें एकटा मार्क्संच जाणें. प्रस्तावनेंत एकच उदाहरण पुरें. असो. सबंध ग्रंथभर शास्त्राचे असेच हाल झालेले आहेत.

अशा तऱ्हेच्या जाडय़ा पंडितांशीं आणि त्यांच्या काळें मार्क्सशीं कोण सनातनी वाद करूं शकेल ?

प्रो. काणे यांनीं कांहीं महत्त्वाचे आक्षेप घेतले म्हणून नव्हे तर त्यांच्या मोठ्या नांवाला मान देऊन आम्ही हें लहानसें चोपडें प्रसिद्ध करीत आहोंत. झालेल्या टीकामध्यें आमचें मत बदलण्यासारखा एकही मुद्दा अगर एकही प्रमाण अजून पुढें आलें नाहीं.

गुरुपौर्णिमा, शके १८५७<br>पुणें.

गो. म. जोशी

## शुद्धीपत्रक

| पान | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ५ | १४ | उत्पन्न | उत्सन्न |
| १४ | २ | ज्याप्रमाणें | त्याप्रमाणें |
| १९ | २ | घर्मनष्ट | धर्म नष्ट |
| २२ | शेवटची | अंगिसर | आंगिरस |
| २४ | खालून ३ | their | there |
| २६ | १७ | सन्यातन्यानो | सनातन्यानो |
| २९ | ६ | Radical | Racial |
| ३५ | ७ | यद्योगे नात्मदर्शन | यद्योगेनात्मदर्शन |

स्थळ प्रत
सं. नि. नं. ५५३
ता. ....
ठाणे.
क्र. ग्रं. ५२३९

# धर्मशास्त्रविचारपरीक्षण

मुंबईचे सुप्रसिद्ध पंडित प्रो. काणे यांनीं धर्मशास्त्रविचार नांवाचा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला आहे. त्यामध्यें आमच्या पुस्तकाचा त्यांनीं उल्लेख केला नसता तर आम्हालाही त्यामध्यें बोलण्याचें कांहींच कारण नव्हतें.

**प्रास्ताविक**

त्यांनीं इंग्रजीमध्यें नाहीं कां एक बडा ग्रंथ लिहिला! त्यावेळीं आम्ही दुर्लक्ष केलें. परंतु आज त्यांनीं आमच्या ग्रंथासंबंधीं विकृत लिहिल्या कारणानें आम्हाला लेखणी उचलावी लागत आहे. सर्व ग्रंथाचें परीक्षण करण्यापूर्वी त्यांच्या पद्धतीचें थोडेंसें दिग्दर्शन करतों.

प्रोफेसरसाहेब म्हणतात ‘ त्याचप्रमाणें रा. जोशी यांनाही अन्वयपद्धति आणि व्यतिरेकपद्धति ते कॉलेजमध्यें पाश्चात्य तर्कशास्त्र शिकले असल्यामुळें माहिती आहे ’ ( पान २९० ). त्यांच्या मनःस्वास्थ्याच्या दृष्टीनें मी येथें सांगतों कीं, मी कॉलेजमध्यें तर्कशास्त्र शिकलों नाहीं, नाहीं तर माझेंही तर्कशास्त्र त्यांच्या तर्कशास्त्रासारखें झालें असतें. त्या पद्धतीचे कांहीं मासले पुढें दाखवितों. प्रोफेसर म्हणतात ‘ देशधर्मान् जातिधर्मान् कुलधर्मांश्च शाश्वतान् । पाषंडगणधर्मांश्च शास्त्रेऽस्मिनुक्तवान् मनुः ॥ याचा सरळ अर्थ या शास्त्रांत मनूनें देशांचे, जातींचे, कुलांचे, पाखंडमताच्या लोकांचे व गणांचे शाश्वत धर्म सांगितले आहेत. येथें ‘ धर्म म्हणजे आचार व शाश्वत म्हणजे बराच काळ टिकणारे क्षणोक्षणीं बदलणारे नव्हेत. ’ एवढाच अर्थ आहे ’ ( पान २९४ ). अर्थातच हा अर्थ सरळ आहे आणि तोही ज्यांना समजत नाहीं असें आम्ही अज्ञ आहोंत. या सरळ अर्थावर आम्ही पुढील सरळ चर्चा केली आहे. ‘ पुन्हा धर्म शब्दाचा आचार असा अर्थ मानल्यास प्रतिज्ञा करणाऱ्या ग्रंथकारानें अशा तऱ्हेचे वेगवेगळ्या देशांचे, वेगवेगळ्या जातींचें अगर वेगवेगळ्या कुलांचे आचार आपल्या ग्रंथांत कोठें तरी द्यावयास पाहिजेत’

(पान ९५). कुलधर्म शब्दाचा कुलाचार असा अर्थ ग्रंथकाराला अभिप्रेत असल्यास त्या ग्रंथांत कोठेंतरी कुलांचे आचार त्यानें दिले असले पाहिजेत. नाहींतर तो प्रतिज्ञा एक करतो आणि तिसरेंच कांहींतरी लिहून ठेवतो असा असमंजसपणाचा दोष त्याच्या पदरीं येतो. म्हणून तोच अर्थ बरोबर आहे असें दाखवावयाचे असल्यास त्या ग्रंथांत कुलाचार सांगितले आहेत. असे प्रत्यक्ष उतारे देवून दाखवावयास पाहिजे हें सरळ तर्कशास्त्र झालें. परंतु तसें कांहींच न करतां प्रोफेसरसाहेबांनीं मेधातिथीपासून स्वतःपर्यंत सर्व टीकाकारांच्या आणि निबंधकारांच्या मतांचा कसा पाऊस पाडला आहे. म्हणून मी प्रोफेसरसाहेबांना पुन्हा विनंती करतो कीं, महाराज मनूच्या ग्रंथांत वेगवेगळ्या देशांच्या, जातींच्या, कुलांच्या, पाखंडांच्या आणि गणांच्या आचारांची चर्चा केलेली दाखवा. नाहींतर मनूनें वापरलेला शब्द त्याचा त्यालाच न कळतां तो हरदत्तगणदासांना जास्त चांगला कळला असें म्हणावें लागेल. पुन्हां मी मनुस्मृतीसंबंधीं लिहीत असतांना त्यांत गौतमधर्मसूत्र कशाला ! धर्म शब्दाचा केव्हां केव्हां आचार अर्थ होतो, ही गोष्ट अज्ञ जोशांना ठाऊक आहे; परंतु उपर्युक्त श्लोकामध्यें धर्म शब्दाचा आचार असा अर्थ होत नाहीं हें त्याच्याच ग्रंथावरून स्पष्ट होत आहे. पुन्हा रा. जोशी यांनीं फक्त कुल्लूकाची टीका पाहिली आहे असें त्यांनीं म्हटलें आहे. सर्व टीका पाहूनही रा. काणे गण शब्दाचा वणिजादि गण असा त्याचाच अर्थ कां स्वीकारतात ? गण शब्दाचा समाजशास्त्रीय अर्थ त्यांना माहिती आहे. गण शब्दाचा अर्थ लोकशासित राष्ट्र असा केला पाहिजे असें काशीप्रसाद जयस्वाल सांगतात. गण शब्दाचा अर्थ लोकशासित जनता असा केला पाहिजे असें डॉ. टॉमस सांगतात. फ्लीट यांनीं गण शब्दाचा अर्थ केवळ जाति असा केला आहे. हें सर्व अर्थ पुढें असून त्या शब्दाचा 'वाणी, उद्यमी लोकांचे जे संघ' असा अर्थ प्रोफेसर घेतात यांत काय बरें हेतु असेल ? पाखंड मत असणें अगर नसणें हेंही नैसर्गिक आहे असें तोच मनू सांगतो. 'हिंस्राहिंस्रे मृदुक्रूरे धर्माधर्मावृतानृते । यद्यस्य सोऽदधात्सर्गे तत्तस्य स्वयमाविशत्' (म. १–२९). असो. मनूच्या मनांत आम्ही सांगितलेलाच अर्थ होता, इतर कोणताही अर्थ नव्हता हें वरील चर्चेवरून विशद होईल.

"हिंदुधर्मशास्त्राचा विषय जर प्रतिपाद्य आहे तर हिंदुधर्मशास्त्राचे ग्रंथ घेऊन त्यांतूनच मुख्यत्वे आपले सिद्धांत समर्थित केले पाहिजेत' (पा. २७९). येथें प्रतिपाद्य विषय समाजरचना आहे आणि हिंदुधर्मशास्त्रापैकी ज्या ग्रंथकारांनीं (म्हणजे मनु, याज्ञवल्क्य) समाजरचना सांगितली आहे त्यांचा पूर्ण उपयोग केला आहे. आम्ही निबंधकारवरिष्ट विज्ञानेश्वर याचीहि किंमत ओळखली नाहीं असें जे त्यांनीं म्हटले आहे ते खरें नाहीं. सापिंड्याचा अर्थ लावतांना आम्ही विज्ञानेश्वरालाच प्रमाण मानले आहे (पा. २०९-२१०). धर्म आणि समाजरचना हे शब्द कांहीं समव्याप्त नाहींत. समाजरचनेपेक्षां धर्म हें फारच मोठें क्षेत्र आहे. असो! रा. काणे यांच्या वादपद्धतीचे एकदोन मासले दाखविले. आतां त्यांच्या सर्व ग्रंथाचे आधीं परीक्षण करून शेवटीं आमच्या ग्रंथावरील सर्व आक्षेपांचें खंडन करूं.

आतांच धर्मशास्त्रविचार करण्याचें कारण काय झालें असावें यासंबंधीं ग्रंथकारानें थोडेसें प्राक्कथन केलें आहे. आज हिंदुसमाजामध्यें बजबजपुरी माजली आहे. आचाराचे बाबतींत पक्षोपपक्ष माजले आहेत. त्यांच्या मतानें चार पक्ष असून त्यांपैकी दोन पक्ष आज प्रबल आहेत. पहिला सनातनी ह्मणविणारांचा आणि दुसरा विचारशीलांचा. पहिला पक्ष सर्व धर्मग्रंथांचा मीमांसा पद्धतीनें समन्वय करून व्यवस्था पहाणारा. दुसरा पक्ष आपली बुद्धी चालवून एकादी पद्धती अहितकारक वाटल्यास मोडून टाकावी आणि हितकारक वाटल्यास नसली तरी चालू करावी असें सांगणारा. पहिला पक्ष समाजांत स्थायीभाव पहाणारा, दुसरा पक्ष समाजाची प्रगती पहाणारा. जणू काय स्थायी भावाशिवाय प्रगती शब्दाला कांहीं अर्थ आहे आणि भोंवताली सारख्या बदलणाऱ्या परिस्थितींत स्थायीभाव राखणें म्हणजे कांहींच कर्तृत्व नाहीं. दुसऱ्या पक्षानें या दोन पक्षांना रूढीवादी आणि तत्त्ववादी अशी नांवें शोधून काढली आहेत. म्हणजे त्यांच्या मतानें रूढीवादी पक्षाला तत्त्व नाहीं आणि तत्त्ववादी पक्षाला रूढी नको आहे. जणू काय ही दोन परस्परव्यावृत तत्त्वें आहेत. तत्त्ववादी पक्षाला रूढी नको असेल तर त्यांना मागील ग्रंथ चिवडण्याची काय जरूरी आहे कोण जाणे. पुन्हां आजच्या पिढीनें पाडलेली नवीन चाल चार पिढ्यांनीं

**पक्षभेद**

रूढी होते याचा विचार केल्यास तत्त्ववादी पक्षानें सारखा दर पिढीला फरक करीत जावें. सांगण्याचा इत्यर्थ असा कीं कोणत्याही दीर्घकालपर्यंत टिकाव धरूं इच्छिणाऱ्या समाजामध्यें रूढीहि पाहिजे आणि तत्त्वही पाहिजे. समाज हा सृष्टीचे स्थिर नियम आणि तदुपबृंहणार्थ उत्पन्न केलेले सांकेतिक नियम या दोन्हीच्या समुच्चयांत उत्पन्न होत असतो. सगोत्र विवाह करावे कीं करूं नये या बाबतींत एकादा सृष्टीचे नियम पाहून सामाजिक मत ठरविल्यानंतर ती रूढीच बनवून टाकावयाची अगर प्रत्येक पिढींतील प्रत्येक विवाहेच्छूनें त्याचा विचार करावयाचा ? उलट भस्म लावावे कीं पावडर लावावी या बाबतींत रूढी बनविण्याचें कांहींच कारण नाहीं. रूढींत तत्त्व असल्यास ते विशद करून मांडावयाचें एवढेंच काम असते. त्यामुळें समाजामध्यें चर आणि अचर असें दोन तऱ्हेचे नियम असतात. स्थिर नियमाकडे बोट दाखवून आम्ही गौण नियमही बदलीत नाहीं असें सनातन्यांनीं म्हणूं नये. बदलणारे गौण नियम दाखवून प्रधान नियमही बदला असें तत्त्ववाद्यांनीं ह्मणूं नये. हे स्पष्टपणें ओळखावयाचे असल्यास सामाजिक घटना पूर्णपणें समजून घ्यावयास पाहिजे. या मर्यादा पुढें ठेवून आपणाला प्रो. यांच्या ग्रंथाचें परीक्षण करावयाचें आहे.

**ऐतिहासिक पद्धतीचीं अंगें**

परीक्षणाला घेतलेला ग्रंथ चाळून पाहिल्यास ग्रंथकार हे ऐतिहासिक पद्धतीचा अवलंब करणारे आहेत असें दिसून येईल. म्हणून वाङ्मयावरून अनुमानें काढूं इच्छिणाऱ्या लेखकानें कोणत्या गोष्टींचा निर्णय केला पाहिजे त्याचा विचार झाला पाहिजे. त्याबरोबरच त्या वाङ्मयीन तत्त्वाची उत्पत्ति होण्याला ऐतिहासिक कारणें काय झालीं असतील आणि त्याचा ऐतिहासिक परीणाम काय झाला याचा निर्णय व्हावयास पाहिजे. एकादी पद्धति नव्हती आणि ती आली असें नुसतें दाखवून कांहींच निष्कर्ष निघणार नाहीं. ऐतिहासिक पद्धतीनें अर्थ लावावयाचा तर लेखकानें देशनिश्चय, कालनिश्चय आणि लोकनिश्चय केला पाहिजे. मग मानवाच्या वैयक्तिक व सांघिक हालचाली पहावयास पाहिजेत. एकादा नवीन संघ पूर्वी असलेल्या लोकवस्तींत शिरला तर पूर्वीच्यांचे नवीनावर परीणाम व नवीनांचे पूर्वीच्यावर परीणाम या गोष्टीही यावच्छक्य पहाव-

-यास पाहिजेत. म्हणजे या दोन्ही संघांच्या भाषा, देवदेवता, सामाजिक व्यवस्था चालीरीति वगैरेंचाही विचार व्हावयास पाहिजे. त्याबरोबरच दोन संघ एका ठिकाणीं आल्यास त्यांचा मिलाफ काय पद्धतीनें घडवून आणीत ही गोष्टही पहावयास पाहिजे. वर्ण्यविषयक लोकांनीं अंगिकारिलेली मिलाफाची पद्धति न घेतां दुसरीच एकादी पद्धति घेऊन ऐतिहासिक अर्थ लावूं लागल्यास तो इतिहास न होतां दुसरेच कांहींतरी होईल. हें येथें स्पष्ट सांगण्याचें कारण संस्कृतीप्रसाराच्या आणि समाजांच्या सदृशीकरणाच्या दोन पद्धती प्रचलीत आहेत. एका पद्धतीमध्यें देशांचे आचार, कुलांचे आचार, जातींचे आचार वगैरे दृष्टीनें विभिन्न असलेल्या दोन संस्कृती जवळ आल्यास त्यांच्या मूळ आचारांत फारशी ढवळाढवळ न करतां त्या विभिन्न देवता एकाच देवतेचीं भिन्न रूपें आहेत अशा तऱ्हेच्या कल्पना उत्पन्न करून त्या विभिन्न संस्कृतीचे लोक एकजीव करून टाकावयाचे. ( absorption method ). दुसऱ्या पद्धतीमध्यें सादृश्यीकरण करतांना संघप्रवेश झाल्याबरोबर पूर्वीचे देशाचार, कुलाचार वगैरे उत्पन्न करून टाकावयाचे असतात ( Extirpation method ). पहिली पद्धति हिंदु धर्मात एक संस्कृति उत्पन्न करणाऱ्या ब्राह्मणांनीं अवलंबिली होती. दुसरी पद्धति वैयक्तिक विचारांना प्राधान्य देणाऱ्या खिस्ती, मुसलमान वगैरे धर्मांनीं अवलंबिली आहे. त्यामुळें पहिल्या पद्धतीचा इतिहास आणि दुसऱ्या पद्धतीचा इतिहास हे दोनही एकाच तऱ्हेनें समजावून घेतां येणार नाहींत.

शेवटीं हा ग्रंथ लिहितांना त्यामध्यें ग्रंथकारानें कितपत संगति ठेविली आहे याचा देखील विचार करावयास पाहिजे. त्याबरोबरच उपमा, उत्प्रेक्षा देतांना अगर तुलना करतांना जीं कांहीं इतर शास्त्रें आणिलीं असतील त्यांची कितपत माहिती करून घेऊन ग्रंथ लिहिला आहे याचाही विचार करावयास पाहिजे.

**प्रो. काणे यांचें शास्त्रज्ञान**

कारण बाह्यशास्त्रांचा उपयोग करतांना मुळांत त्या शास्त्रांत कधींच न सांगितलेल्या गोष्टी सांगून शास्त्रनाम तेवढेंच पुढें केलें आहे किंवा काय हें देखील पहावयास पाहिजे. कारण त्यांनीं अशा तऱ्हेनें बऱ्याच शास्त्रांचा उल्लेख केला आहे. उत्क्रांतीशास्त्रासंबंधीं काणे लिहितात, " पण डार्विननें

माकडाची माणसें बनलीं असें सांगितलें आहे. माकडांनीं रानांतील पानें व फळें ओरबडण्याचा धंदा सोडून सृष्टिनियम मोडला गेला तरी त्या माकडांचा निर्वंश न होता चांगलीं माणसें बनूं लागलीं " (पा. २८९–२९०). यांतील पहिला सिद्धांत माकडांचीं माणसें बनली. त्यासंबंधीं पुढील मत वाचनीय आहे. " प्राण्यांचे जे मुख्य गट आहेत त्यांच्याबद्दलचा विचार केल्यास उत्क्रांतिपेक्षां सृष्टी हेंच तत्त्व जास्त खरें ठरतें. ह्या मुख्य गटापैकीं कोणताही एक दुसऱ्या कोणत्याही गटापासून उत्क्रांत झाला असें दाखविणारा काडीइतका देखील पुरावा उपलब्ध नाहीं. प्रत्येक गट इतरापासून भिन्न अशी एक विशिष्ट सृष्टी आहे. मनुष्य आज आहे तसाच्या तसा पृथ्वीच्या पाठीवर असलेला अनंत काळपासून दिसतो. दोन प्राणिवर्गांना जोडणारे दुवे कोठेंही आढळत नाहींत. " आजकालची शास्त्राची स्थिति पाहिली तर माकडापासून माणूस उत्क्रांत झाला असें कोणीच म्हणत नाहीं. परंतु त्या गृहीत कृत्यावर प्रोफेसरसाहेबांनीं पुढील अनुमान काढलें आहे. माकडांनीं रानांतील पानें व फळें ओरबडण्याचा धंदा कधीं सोडून दिला? कांहीं माकडांनीं तोच धंदा कां राखला? धंदा ज्यांनीं सोडून दिला त्यांचा निर्वंश झाला नाहीं असें म्हणावयाचें असल्यास त्या धंदा सोडलेल्या माकडांचा वंश आज कोठें सांपडतो कीं काय हें दाखवावयास पाहिजे. तो मानववंश खास नव्हे. ' कणादानें सर्व भौतिक सृष्टी कणापासून निर्माण झाली असें दोन अडीच हजार वर्षांपूर्वी वैशेषिक दर्शनांत सांगितलें. १९ व्या शतकांतही पाश्चात्त्य विज्ञानशास्त्रानें तसेंच सांगितलें. तेव्हां आमचा कणाद केवढा अजब शोधक असें आम्ही साभिमान म्हणत होतों. पण आतां विज्ञानशास्त्रानें कण वगैरे सर्व चिरडून इलेक्ट्रानची उपपत्ति काढली आहे. तिच्या दृष्टीनें कणादाचा शोध म्हणजे कांहींच नाहीं असें ठरतें (पा. २८०). सर अर्नेस्ट रुदरफर्डनें कण म्हणजे atom याचें इलेक्ट्रानयुक्त स्वरूप दाखविलें तरी देखील त्यापासून जगदुत्पत्ति कशी झाली, त्या प्रक्रियेची पद्धति कोणतीं वगैरे गोष्टी शिल्लक उरल्या आणि त्यामुळें पंडित वेगवेगळ्या उपपत्त्या देवूं लागले. त्यामध्यें प्रो. लॉइड मॉर्गन यानें जगत्प्रपंच हा इमर्जन्ट एव्होल्यूशनच्या पद्धतीनें झाला आहे असें मत पुढें मांडले. त्या मताचें मूल तत्त्व असें आहे. एकादी नवीन घटना जेव्हां

दुसऱ्या कांहीं घटनांच्या संघटनेनें प्रतीत होतें त्या वेळीं त्या नवीनामध्यें सांपडणारे गुण असें असतात कीं, ते त्या घटनेच्या जनक घटनांच्या गुणावरून कधींही अनुमित करतां येणार नाहींत. म्हणजे दर वेळीं नवीन घटना उत्पन्न होतांना कांहींतरी नवा गुण उत्पन्न झाला. उदाहरणानें बोलावयाचें तर हायड्रोजन आणि ऑक्सिजन या दोन वायूंच्या संगतीकरणापासून जल नांवाचें द्रव्य उत्पन्न झालें, परंतु दोनही वायू आणि त्यांचें संगतीकरण करणारी विद्युत् या तीनही कारणांच्या गुणापासून जलाचे गुण अनुमित करणें शक्य नाहीं. अथवा प्रोफेसरसाहेबांचा इलेक्ट्रान घेतला तरी त्याच्या गुणावरून तज्जन्य जो अणु त्याचे गुण अनुमित करतां येणार नाहींत. हिंदुस्थानांतील तत्त्वज्ञानांत काय दिसतें तें आतां पाहूं.

> ' आरंभवादः कणभक्षपक्षः संघातवादः तु भदंतपक्षः ।
> सांख्यादिपक्षः परीणामवादः वेदांतपक्षस्तु विवर्तवादः ॥ '

त्यांपैकीं पहिला जो आरंभवाद त्याची प्रक्रिया शास्त्रांत पुढीलप्रमाणें दिलेली आहे. समवायिकारण, असमवायिकारण आणि निमित्तकारण हीं सर्व मिळून ' स्वस्मात् भिन्नं कार्यमुत्पादयन्ति ' म्हणजे आपणापासून भिन्न गुण धारण करणारे कार्य उत्पन्न करतात. म्हणजे कारणांच्या वैयक्तिक वेगवेगळ्या गुणावरून कार्यगुण अनुमित करणें शक्य नाहीं. हा तत्त्वज्ञानांत कणादांचा पक्ष असल्याकारणानें तो इलेक्ट्रानच्या उपपत्तीनें कांहींच नाहीं असें न ठरतां फारच महत्त्वाचा आहे असें ठरत नाहीं का ? परंतु कणादांचा सृष्ट्युत्पत्तिबद्दल काय पक्ष आहे, आधुनिकांचा काय पक्ष आहे हें दोन्हीं पाहिल्याशिवाय वरील तऱ्हेचें वाक्य खरोखर लिहिणें योग्य नाहीं. परंतु म्हणतात ना ' वृद्धास्ते न विचारणीयचरिताः ' वर केलेल्या चर्चेवरून दिसून येईल कीं, प्रोफेसरसाहेबांचा पौर्वात्य अगर पाश्चिमात्य तत्त्वज्ञानांशीं काडीइतका देखील परिचय नाहीं.

**आमचे गुरु पौर्वात्यच**

येथें एक अत्यंत महत्त्वाचा मुद्दा उत्पन्न होतो तो असा कीं, आमच्या एकूणएक टीकाकारांनीं आम्ही आजचे पाश्चात्य वैज्ञानिक कांहीं गोष्टी बरोबर आहेत म्हणतात म्हणून आम्ही आमच्या इकडील गोष्टींचें समर्थन करतों असें विधान केलें आहे. परंतु तें खरें नाहीं.

आमच्या इकडचे सिद्धांत आहेतच. त्यांना प्रत्यंतर पुरावा इतर शास्त्रांतही मिळतो असें आमचें म्हणणें आहे. इतर शास्त्रांकडे धाव घेण्याचें कारण तरी आमचे आक्षेपक झाले आहेत. आमच्या समाजांत अशी मनःप्रवृत्तीच बनून गेली होती आणि आहे कीं, आजच्या विजयी पाश्चिमात्यांचीं शास्त्रें हीं प्रत्यक्ष प्रमाण असून मानवसमाजाला फारच हितकारक आहेत. तीं तशीं आहेत किंवा नाहींत हा प्रश्न अलाहिदा आहे. परंतु अशी अंधश्रद्धा उत्पन्न झाली आहे खरी ! म्हणून जगाचें मन वळविण्याचे जे अनंत प्रकार त्यापैकीं ' छन्दानुरोधेन ' या प्रकाराचा अवलंब करून काय बाबा तुम्हाला पाश्चात्य शास्त्रें पटतात, तर पाश्चत्य शास्त्रांतूनही सिद्धांत प्राचीनांच्या मताप्रमाणेंच निघतात असें दाखविण्याकरितां आम्ही पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा आणि शास्त्रांचा पसारा मांडला. आतां प्रोफेसरसाहेबांच्यासारखे लोक असें सांगू लागले आहेत कीं आपल्या सिद्धांताचें समर्थन पौर्वात्य ग्रंथांतून करा. पौर्वात्य ग्रंथांतून जेव्हां शास्त्रीपंडीत समर्थन करीत होते त्यावेळीं उपयुक्ततावाद आणि ऐतिहासिक पद्धतीसारख्या नव्या पद्धती धर्मग्रंथांना लागण्याचें सत्र चालू होतें. आतां आम्ही उपयुक्ततावादानें छाननी करूं लागल्याबरोबर आम्हाला टीकानिबंध वाचण्याची शिफारस प्रोफेसरसाहेब करूं लागले. तेव्हां आमच्या सर्व आधुनिकांना अशी जोराची विनंती आहे कीं, या बाबतींत निष्कर्ष काढण्याला कोणती पद्धति वापरावयाची, कोणतीं प्रमाणें घ्यावयाचीं यासंबंधीं आधीं एकमत करून घ्या म्हणजे त्या पद्धतीनें चर्चा करावयास आम्ही तयार होऊं. परंतु एका बाजूनें शब्दप्रामाण्य ( a priori ) आणि दुसऱ्या बाजूनें ऐतिह्यप्रामाण्य (a posteriori) हीं दोन्हीं एकसमयावच्छेदेंकरून वापरूं नका. येथें आधुनिकांच्या नजरेस एक गोष्ट आणावीशी वाटते ती अशी कीं, ' Nature supplies no premises ' सृष्टी आपण होऊन कोणतीच गृहीत कृत्यें देत नाहीं. त्यामुळें कोणत्याही चर्चेमध्यें सुरुवातीला आपण जेथून कोठून निघूं तें स्थान ऐतिह्यांतून मुळींच सांपडणार नाहीं. तसें मूळ तत्त्वच न मिळाल्यास जगांतील कोणताही सिद्धांत स्थिर होणें शक्य नाहीं. म्हणूनच सत्यं, शिवं, सुंदरं ( त्याबरोबरच प्रोफेसरांच्या मतानें स्वातंत्र्यं ) ही वादविवादाच्या आणि मूल्यांच्या अतीत मानतात आणि त्यांच्या गुणावगुणांची विचिकित्सा करावयाची नसते. उप-

युक्तता वादानें अगर अलीकडील राष्ट्रहित्याच्या दृष्टीनें जर आपण सत्याचें मूल्य ठरवूं लागलों तर तें निरपवाद ठरेलच असें नाहीं. म्हणून आधीं चर्चेचे ध्येय (हीं ध्येयें सृष्टी पुरविणार नाहीं. सृष्टी त्यांना मदत करील अगर त्यांचा नाश करील. परंतु सुरवातीला आपण होऊन कांहींच सांगणार नाहीं.) चर्चेचा निष्कर्ष वगैरे काढण्याच्या पद्धती आधीं ठरवून घ्यावयास पाहिजेत. असो.

प्रो. काणे ज्यावेळीं इतर शास्त्रांबद्दल बोलूं लागतात त्यावेळीं ते त्या शास्त्रांची कितपत माहिती करून घेतात ही गोष्ट दोन उदाहरणें घेऊन वर नजरेस आणलेंच आहे. त्यांच्या ग्रंथांतून इतर हवीं तेवढीं उदाहरणें काढून देतां येतील, परंतु तो मुद्दा बाजूला ठेऊन

**मतभेदाचें स्वरूप**

दुसरा जो संगतीचा मुद्दा त्याकडे वळूं. प्रो. काणे म्हणतात. 'या विद्वान् ग्रंथकारांशीं, विशेषतः त्यांच्या कांहीं सिद्धांत काढण्याच्या पद्धतींशीं आणि सिद्धांताशीं माझा तीव्र मतभेद आहे' (पा. २७८). मतभेद मृदु किंवा तीव्र असेल परंतु तो कोणत्या सिद्धांताशीं आहे आणि कोणत्या सिद्धांताशीं नाहीं हें स्पष्ट न सांगितल्यास सबंध ग्रंथाबद्दल दुर्मतें पसरतात ही गोष्ट प्रोफेसरसाहेबांच्या लक्षांत यावयास पाहिजे होती. उदाहरणानें बोलावयाचें तर पातिव्रत्य हा अत्यंत श्रेष्ठ गुण आहे, समाजांत आत्महत्यांचें प्रमाण वाढणें हा दोष आहे, समाजामध्यें वेड लागणें आणि मानसिक रोग यांची वृद्धि होणें इष्ट नाहीं आणि गरमी, परमा वगैरे रोगांचा फैलाव होणें हानिकारक आहे असे चार सिद्धांत काढले आहेत. त्या सिद्धांताशीं देखील प्रोफेसर काणे यांचा तीव्र विरोध असल्यास त्याचें समाजशास्त्र समजावून घेण्याकरितां त्यांच्याजवळ शिष्य म्हणून रहाण्याला मी तयार आहें. त्यांचे माझ्याशीं कितीहि तीव्र मतभेद असले तरीही माझ्या ग्रंथांत त्यांच्याशीं जुळते कांहींच सिद्धांत सांपडले नाहींत काय? तेवढ्यांचे देखील त्यांनीं दिग्दर्शन केलें नाहीं. मतांच्या बाबतींत असें झालें आहे कीं, एकच मत मी आणि त्यांनीं सांगितल्यास, माझ्या बाबतींत तें दुर्मत ठरतें आणि त्यांच्या स्वतःच्या बाबतींत तें संस्कृतीचें अंग ठरतें ही गोष्ट मी लवकरच दाखविणार आहें. या ग्रंथांसच स्वतःचीच संगति फार वाखाणण्यासारखी

आहे. ' अशा दृष्टीनें विचार करून सनातन धर्म म्हणजे काय तें आतां पहावयाचें. त्यांत इतर धर्मांशीं अशी त्याची तुलना करावयाची नाहीं " ( पा. ३ ). त्या वाक्यापासून बरोबर तीन ओळी पुढें गेलें म्हणजे पुढील वाक्य सांपडतें. ' आर्यधर्माचें स्वरूप सांगतांना प्रथम थोडेसें तुलनात्मक विवेचन केलें पाहिजे ' (पा. ३). आतां प्रश्न असा येतो कीं, तुलना करावयाची अगर करावयाची नाहीं. आमच्यासारखा अज्ञ गृहस्थ जर या ग्रंथावरून समजावून घेऊं लागला तर त्यानें या दोहोंपैकीं कोणता मार्ग स्वीकारून निर्वाह करावा. प्रो. काण्यांच्या प्रमाणेंच अज्ञ जोशांना ठाऊक आहे कीं, धर्माचें स्वरूप, त्याचीं कारक प्रमाणें, त्याचीं ज्ञापक प्रमाणें वगैरे गोष्टी विशद करून सांगणें खरोखर फार कठीण आहे, परंतु आम्ही वर दिलेल्यासारखी वाक्यांची जोडी ग्रंथांत सांपडणें बरें नव्हे. ' या इतिहासावरून अहिंसेचें तत्त्व वैदिककाळींच प्रतिपादण्यांत येऊं लागल्याचें दिसून येईल. अर्थात् बौद्ध व जैन यांनीं तें चालू केलें असें म्हणतां येणार नाहीं ' ( पा. १८२ ). एवढें खरें कीं, बौद्ध आणि जैन यांनीं अहिंसेवर विशेष जोर दिला ' ( पा. १८३ ). या दोन वाक्यावरून असा अर्थ होतो कीं, अहिंसा हें वैदिक धर्माचें एक अंग असून बौद्ध जैनांनीं त्यावर विशेष जोर दिला, त्याचा अतिरेक केला. त्या अतिरेकाचा परिणाम काय झाला ही गोष्ट इतिहासज्ञांस विदित आहे. त्याचा विचार करून डाहलमननें बुद्धाला मोठी विनाशक शक्ती असें म्हटलें आहे. परंतु जोशांनीं लिहिलेला इतिहास चूक ठरविण्याकरितां प्रो. काणे पुढील वाक्य लिहितात, 'वैदिक म्हणविणारांनीं यज्ञयाग बंद केले, अहिंसेचा जोरानें पुरस्कार केला, कलियुगांत यज्ञयाग, तपश्चर्या, ज्ञान वगैरे सर्वांपेक्षां दानधर्मच श्रेष्ठ होय असें मनुसारखे वैदिक धर्मानुयायी म्हणूं लागले तेव्हां बुद्ध पंथाचें उच्चाटन झाल्यासारखें दिसतें आहे खरें ! (पा. २८५). आतां या सबंध वाक्याचा विचार केला तरी कांहींच निष्पन्न होत नाहीं. अहिंसा आतांच उत्पन्न झाली नसल्याकारणानें ती वैदिक धर्मांतीलच आहे. इतर सर्वही आर्यधर्माचींच अंगें आहेत. मनुनें दानधर्म सांगितला म्हणजे पूर्वी दानधर्म नव्हता किंवा काय ? पुन्हां दानधर्म हा बौद्ध धर्माचें प्रधान अंग आहे असेंही नाहीं. मग बौद्ध धर्माचा विजय झाला म्हणजे काय प्रक्रिया

घडून आलेली दिसते. प्रो. काणे यांना हिंदूविचारवंतांची संस्थितीकरण पद्धति ( absorption method ) माहिती असती तर त्यांनीं आमच्या प्रमाणेंच सांगितलें असतें. तत्त्वज्ञानांत बुद्धानें कांहीं नवीन सांगितलें आहे कां? बुद्धकाळापूर्वी यज्ञयाग सार्वत्रिक होते आणि ते पुढें सर्व समाजांतून नष्ट झाले असें दाखविण्याला कांहींतरी ऐतिहासिक पुरावा द्यावयास पाहिजे असें मला वाटते. त्यांच्याच ग्रंथावरून पाहिलें तर यज्ञयाग ऋग्वेदकाळीं बंद झाले होते असें दिसते 'यज्ञेन यज्ञमजयन्त देवाः तानि धर्माणि प्रथमानि आसन्', हें पुरुषसूक्तांतील ऋगर्ध सर्वांना ठाऊक असेलच. त्यांत यज्ञाला धर्म असें म्हटले असून तो शब्द धर्मन् असा नपुंसकलिंगी योजलेला आहे. हे यज्ञरूपी धर्म पूर्वी होतें असें त्यांत म्हटलेलें आहे. म्हणजे यज्ञ हे वैदिक धर्माचें पूर्वस्वरूप होते' (पा. ५) येथें प्रो. काणे सांगतात कीं, ऋग्वेदकाळीं यज्ञधर्म प्राचीन झाला होता आणि वर सांगतात कीं, बुद्धानंतर यज्ञयाग बंद केले तेव्हां बुद्ध हा खरोखर ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलाच्या आधीं होऊन गेला असला पाहिजे. मोठमोठ्या पंडितांचा असा घोटाळा कां होतो याचा खुलासा आम्ही जेव्हां आर्यधर्माची प्रसरणपद्धति विशद करूं तेव्हां आपोआप होईलच. येथें इतकेंच सांगावयाचें कीं आर्यधर्माचा विचार करतांना तेथें जी अहिंसा त्यांना सांपडते, तीच जोशांचा अधिक्षेप करतांना बौद्ध धर्मांतून घ्यावी लागते.

**मतैक्य**

जोशी यांचा अधिक्षेप करण्याकरितां जो एक वाक्यसमुच्चय त्यांनीं उचलून घेतला त्यामध्यें पुढील वाक्य सांपडतें 'पुत्रैषणा, दारैषणा, वित्तैषणा' या तिहींच्या तडाक्यांतून सुटलेला प्राणी विरळाच आणि आधुनिक युरोपच्या संस्कृतींत नाहींच नाहीं' (पा. २७८.) पुढें आमची 'संस्कृती म्हणजे काय?' म्हणून जें प्रकरण त्यांनीं लिहिलें आहे त्यामध्यें पुढील वाक्यें सांपडतात 'असें जरी आहे व जरी त्यांच्यांतही त्यागी, तृष्णाविरहित अशीं अनेक माणसें होऊन गेलीं तरी सर्वसाधारण माणसाचें ध्येय तें नव्हतें व अलीकडच्या तीनशें वर्षें तर नाहींच. तिकडे सर्वसाधारण माणसाचें ध्येय भौतिक सोयी व सुखें मिळविणें व त्यासाठीं

सततोद्योग करणें हेंच असतें' (२०६). ह्या दोन वाक्यांमध्यें मांडण्याच्या पद्धतीशिवाय कोणता फरक आहे. तत्त्वतः त्यांचा आणि माझा सिद्धांत एकच आहे. असें असूनही ते माझ्या सिद्धांताशीं तीव्र मतभेद असल्याचें विदित करीत आहेत. पुन्हां त्यांनीं सुरुवातीला आपण निःपक्षपातीपणानें विचार करणार आहोंत अशी ग्वाही दिली आहे. आह्मी हिंदु उपासनेच्या बाबतींत पुढील वाक्यें लिहिलीं आहेत 'हिंदु धर्म हा संस्कृतिप्रधान असल्यामुळें, प्रत्येक व्यक्तीनें आपल्या हिंमतीप्रमाणें जी कांहीं परमेश्वरविषयक कल्पना असेल त्या कल्पनेला धरून परमेश्वराची उपासना करावी अशी प्रत्येक हिंदूला मुभा आहे. त्यानें परमेश्वर सगुण मानावा अगर निर्गुण मानावा, तूं अमकेंच स्वरूप मान असा आग्रह केलेला दिसत नाहीं (पा. २०६). तेथील सर्व चर्चा वाचून ती प्रोफेसर काणे यांच्या पुढील वाक्यखंडाशी ताडून पहावी. 'परमेश्वराची पूजा करण्याचे मार्ग भिन्न आहेत. एकाच मोठ्या मनुष्यानें सांगितलेल्या मार्गानें परमेश्वराची पूजा केली तरच पारमार्थिक कल्याण होते, असें नाहीं. ही फार प्राचीन काळापासून आमच्यांतील सर्व विचारी लोकांची समजूत असल्यामुळें इत्यादि' (पा. २०४). प्रो. काणे यांनीं दिलेले हे संस्कृतीचें अंग आणि आह्मी केलेली चर्चा यांमध्यें कोणताही फरक मानावा लागेल असें वाटत नाहीं. परंतु प्रोफेसर सांगतात कीं त्यांचा माझ्याशीं मतभेद आहे आणि ते निःपक्षपाती आहेत. देवकल्पनेविषयीं आह्मी पुढील वाक्य लिहिले आहे 'अस्पृश्यांनीं केलेली मरीआईची उपासना, ब्राह्मणानें केलेली रामकृष्णांची उपासना, शैवांनीं केलेली शिवाची उपासना, योग्यानें केलेली आत्मोपासना वगैरे सर्वच उपासना जर एका परमेश्वराला पोहोंचावयाच्या असतील' (पा. २०९) प्रो. काणे यांची देवकल्पना पुढीलप्रमाणें 'कोणत्याही रूपानें किंवा नामानें परमेश्वराची भक्ती केली, तरी ती एकाच परमेश्वराला पोचते' (पा. २०३). तरीही प्रो. काणे यांचा माझ्याशीं तीव्र मतभेद आहे तो कायमच.

प्रो. काणे म्हणतात, 'आमच्या शिक्षणविषयक कल्पना आज विसाव्या शतकांतही शिक्षणशास्त्रज्ञांना माना डोलवावयास लावतील अशाच आहेत.' (पा. २०७). आह्मीं म्हटलें आहे समाजशास्त्रदृष्ट्या शिक्षणाचें इतकें उत्तम ध्येय आणि इतकी उत्तम पद्धति आज जे गाडीभर ग्रंथ त्या शास्त्रावर

प्रसिद्ध होत आहेत त्यामध्यें कोठें केलेली आमच्या आढळण्यांत नाहीं " (पा. ३४२). भाषेंतील तीव्रता सोडून दिल्यास प्रो. काणे यांचा आणि माझा सिद्धांत एकच आहे असें दिसून येईल. धर्माचे ध्येय स्वर्गमोक्षादि आम्हीही पण सांगतों तेही पण सांगतात. झाली ही चर्चा संपवून आम्ही असें म्हणतों कीं, प्रो. काणे यांनीं आमची संस्कृति म्हणजे काय ? असा प्रश्न उत्पन्न करून जी चवदा कलमी कैफीयत तयार केली आहे, त्यापैकीं तेरा कलमें त्यांना आणि आम्हांला समान आहेत. फक्त ते जातिसंस्थेची कल्पना आमच्यापासून भिन्न आहे असें दर्शवितात. त्याचा अर्थ असा कीं, आधुनिक पद्धतीनें अभ्यास केला असल्याकारणानें निव्वळ संस्कारानें समाजाचें रूप बदलतें अशी त्यांची कल्पना आहे. त्यामुळें विचारकर्तृक सांस्कारिक आचारांचे बाबतींत त्यांचें आमचें मतैक्य आहे. आमचें पुढें जाऊन असें म्हणणें आहे कीं, ज्या मानवावर हे सगळे संस्कार व्हावयाचे त्या मानवाच्या गुणांचा स्वरूपतः विचार होऊन त्यांचीही व्यवस्था व्हावयास पाहिजे, नव्हे प्राचीनांनीं केली होती.

यामध्यें आमची बौद्धिक गुलामगिरी कोठें दिसून येते ? जातिसंस्थेच्या आमच्या कल्पनांना ते भ्रम म्हणतात. ' जातिसंस्था व तदंतर्गत विवाह व भोजन यांच्या मर्यादा ह्याच केवळ आमच्या संस्कृतीचें प्रधान अंग आहेत असा आम्हांपैकीं पुष्कळांना भ्रम होतो तो होवूं नये, म्हणून इतकी लांब यादी द्यावी लागली. ' (पान ३०९). स्वरूपतः मानवाचा अभ्यास करून समाजाचा अभ्यास करणारांचीं उत्तरें प्रो. काणे काढतात त्यापासून फारच भिन्न येतात. भोजनाच्या विचारासंबंधीं डॉ. श्रीधर व्यंकटेश केतकर म्हणतात 'हिंदूंच्या धर्मशास्त्रांत जो एक विशेप भाग उत्तरोत्तर वाढत चाललेला दिसतो तो हा कीं, त्यांच्यामध्यें सोंवळ्या ओंवळ्याचे नियम सारखे वाढत चालले आहेत. हा परिणाम कशाचा, याचा विचार करतां असें म्हणावें लागतें कीं, कांहीं अंशीं शौचधर्मविषयक नियम हा खरोखर समाजविकास

आहे. आरोग्याविषयक स्थिति चांगली रहावी म्हणुन स्पर्शास्पर्शविचार जगांत वाढतच आहे ' प्राचीन महाराष्ट्र (पान२०४). ज्याप्रमाणें भक्ष्याभक्ष्य विचारही वाढत आहेत, आमच्या जातिसंस्थाविषयक भ्रमासंबंधीं तेंच ग्रंथकार म्हणतात ' आपल्या समाजाचीं जीं अंगें अनेक सहस्रकें आपणांस दृष्ट होतात तीं येणेंप्रमाणें: ( १ ) देशांत अनेक जाति आहेत. त्या जातींत ब्राह्मणास प्राधान्य आहे. ( २ ) देशांत जाति हजारों असल्या तरी समाजांत वर्ण चार आहेत हें एक सामाजिक तत्त्व लोकांनीं मनाशीं बाळगलें आहे' प्राचीन महाराष्ट्र (पान२९८). यावर जास्त भाष्य पुढें करूं. आमच्या विवाहविषयक भ्रमासंबंधीं तेच ग्रंथकार सांगतात. 'भिन्न जातीशीं लग्नव्यवहार फारसा होत नसावा, तथापि राजेलोकांना भिन्न देशींच्या राजकन्यांशीं लग्नें करण्यास हरकत नाहीं, अशी प्रवृत्ति असावी ' ( प्रस्तावना पान २४।२५ ). मानवाचा स्वरूपतः अभ्यास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीलाच हा भ्रम होऊं लागला आहे, एवढेंच येथें नमूद करतों. असें कां होतें याचा विचार केल्यास असें दिसून येईल कीं, प्रो. काणे वगैरे पंडीतांची समाजाभ्यासाची पद्धति बरोबर नाहीं. ते मानवाचा स्वरूपतः अभ्यास न करतां फक्त त्यानें घडवून आणलेल्या कृतींचा अभ्यास करतात आणि त्यांच्या ग्रंथाला तो समतोल बुद्धीनें लिहिला आहे असें शिफारसपत्र आमचे वर्तमानपत्रकर्तें देतात. अनेक सहस्रकें जर आमच्या समाजांत जातिसंस्थेचें सूत्र अनुस्यूत असेल तर ' जातिसंस्थेंतच आमच्या संस्कृतीचें सारसर्वस्व सांठविलेलें आहे ' असें म्हणणारांना चूक कसें मानावें ! प्रो. काणे यांनीं जी वर कैफियत दिली आहे त्यांतील कोणतें सूत्र सर्व संस्कृतींत सांपडतें ! ' परमेश्वराची पूजा करण्याचे भिन्न भिन्न मार्ग आहेत ' असें प्रो. काणे सांगतात, परंतु हें सूत्र परमेश्वरच न मानणाऱ्या मीमांसकांना अगर सांख्यांना लागूं पडणार नाहीं. त्याप्रमाणेंच त्यांनीं दिलेल्या एकूणएक कलमांची व्यवस्था आहे. त्यामुळें असेंच म्हणावें लागेल कीं, जातिसंस्था हेंच हिंदूंची अभिन्नपरंपरा दाखविण्याचें एकचएक सूत्र म्हणून हिंदूंचें सारसर्वस्व आणि वैशिष्ठ्य म्हणून सांगण्यास शिल्लक रहातें. हेंच फक्त एकटें अखिल हिंदुमात्राला लागूं असें तत्त्व सांगावयास शिल्लक रहातें.

येथपर्यंत असें दाखविलें आहे कीं, समाजाच्या ध्येयविषयक बाबतींत प्रो. काणे आणि आम्ही यांच्यामध्यें पूर्ण मतैक्य आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवस्थेंत उतरल्याबरोबर त्यांचा तीव्र मतभेद उत्पन्न होऊं लागतो तो काय म्हणून याचा आतां विचार करावयास पाहिजे. प्रो. काणे यांना हरदत्तानें सांगितलें आहे कीं, देशाचार, जातींचे आचार, कुलांचे आचार, पाखंडाचे आचार आणि गणांचे आचार यांचा विचार करावयास पाहिजे.

**मतभिन्नतेचीं कारणें अथवा प्रोफेसरांची चुकीची ऐतिहासिक दृष्टि**

आम्हीहि पूर्वी ऐतिहासिक पद्धतीनें विचार करणाराला किती गोष्टींचा विचार करावा लागतो त्याची यादी दिली आहे. त्यामध्यें लोकविचार हें एक कलम दिलें आहे. त्यामुळें हें जें धर्मशास्त्रीय वाङ्मय वाचून प्रो. काणे यांनीं वैदिक धर्माचा बोध करून घेतला तें वाङ्मय एकाच लोकांचे आहे किंवा काय हा प्रश्न पुढें घेऊन एकाच लोकांचे नसल्यास, ते विभिन्न लोक कोणते आणि त्यांचें काय तत्त्वावर संगतीकरण झालें याचा विचार व्हावयास पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें तर श्रौतधर्म, स्मार्तधर्म, पौराणधर्म हे एकाच मानवसमूहाचे असून ते सर्वांना लागू होतात काय हें ठरवावयास पाहिजे. श्री. चित्रावशास्त्री म्हणतात, ' वेद आणि पुराणें पाहूं गेल्यास त्यांचा संबंध विशेषसा दिसून येत नाहीं. उपास्यदैवतें, त्यांची उपासना, सृष्ट्युत्पत्ति, कालमापनसाधनें भौगोलिक स्थळें व वंशावळी या सर्व बाबतींत दोन्ही ग्रंथांत म्हणण्यासारखें साम्य नाहीं. यावरून भिन्न संप्रदायांतील लोकांनीं सांभाळलेलें हें वाङ्मय दिसतें. उल्लेखाच्या दृष्टीनें पाहिलें तर वेदांतही पुराण शब्दानें ग्रंथांचा निर्देश येतो. पुराणांनीं वेदांचा गौरव तर मूलभूत मानला आहे. पुराणांचें नीट समालोचन केल्यास असें दिसतें कीं, वेदांपेक्षांही पुराणांचा कांहीं भाग निःसंशय प्राचीन असावा. निदान त्यांतील परंपरा तरी प्राचीन दिसते' प्राचीन चरित्रकोश (प्र.पा.२.) हें वाङ्मय दोन भिन्न संप्रदायांतील लोकांनीं सांभाळलें आहे, असें वर दिलेलें आहे. परंतु हे लोक वंशदृष्ट्या एक होते काय, यांची वसतिस्थानें तरी एक होतीं काय, या प्रश्नांचा विचार झाला पाहिजे. भौगोलिक स्थळांत देखील फरक असल्याकारणानें हे खरोखरच दोन भिन्न स्थळीं रहात असणारे लोक

असले पाहिजेत. पुराणांच्या परंपरा जर वेदापेक्षाही प्राचीन असतील तर पौराणवाङ्मय लिहिणारांचे पूर्वज आणि वैदिक संस्कृति निर्माण करणारे ऋषी हे समकालीन असण्याचा संभव आहे. म्हणून वेदांत पुराणांचा आणि पुराणांत वेदांचा उल्लेख दोन्हीही विकृत न होतां येऊं शकतो. यावरून असें दिसतें कीं, श्रौतधर्म आणि पौराणधर्म हे समकालीन असून वेगवेगळ्या स्थळींच्या वेगवेगळ्या मानवसमूहांना लागत असत. त्यांच्या एकीकरणकालीं अगर समन्वयकालीं सर्व आचारांचीं मूळें वेदांत आहेत हें सादृश्य आणण्याच्या दृष्टीनें चिकटविलेलें नातें भोळे प्रो. काणे परमार्थतः घेऊन चालले आहेत. मिलाफ करण्याच्या आर्यपद्धतीचें सविस्तर विवेचन पुढें करावयाचेंच आहे, परंतु ज्यावेळीं या लोकांचें एकीकरण झालें त्यावेळीं या एकीकृतांचा आचारग्राम वाढणारच. परंतु त्यामुळें श्रौतपरंपरेच्या लोकांनीं पौराणपरंपरेंतले धर्म घेतले आणि पौराणपरंपरेंतील लोकांनीं श्रौताचार घेतले अगर धर्मपरिवर्तन झालें असा अर्थ मुळींच होत नाहीं. एकंदर आचारग्राम वाढला परंतु पूर्वींचे आचार नष्ट होऊन अगर बदलून त्या ठिकाणीं नवे आचार आले असा त्याचा अर्थ होत नाहीं. प्रो. काणे यांचे परात्पर गुरु जे पाश्चात्य लेखक त्यांना, त्यांच्या समाजांतील कांही विवक्षित कारणांमुळें संस्कृतीच्या अगर धर्मांच्या इतिहासांत फक्त कालभेद दिसतो. दुसरे कांहीं भेद असूं शकतील अशी कल्पनादेखील त्यांच्या मनाला शिवलेली दिसत नाहीं. आतां आपण स्मृतीसंबंधींच्या त्यांच्या म्हणण्याचा विचार करूं. 'उपलब्ध स्मृति फार प्राचीन नाहींत. इ. सनापूर्वीं ५००।६०० वर्षांनंतरच्या त्या आहेत असें माझें मत आहे' (पा. २०). जगाच्या पंचमांश किंवा षष्ठांश संख्या हिंदुस्थानांत आहे. हीच स्थिति प्राचीन काळीं सुद्धां असावी असें कलिंग देशाचा राजा खारवेल याच्या इ. सनापूर्वींच्या लेखावरून अनुमान निघतें' (पा. २८३). खारवेलच्या काळीं हिंदुस्थानदेश पूर्ण वसलेला होता ही गोष्ट त्यांना मान्य आहे खारवेल हा सरासरी ख्रिस्ती सनापूर्वीं १७५ वर्षे होऊन गेला. तत्पूर्वी चारशें वर्षें म्हणजे बुद्धाच्या जन्मकाळींही हिंदुस्थानदेश तसाच वसलेला असेल असें मानण्यास त्यांची हरकत नसावी. तेव्हांपासून सरासरी एक हजार वर्षांचा काळ ते स्मार्तवाङ्मयाला देतात. या कालांत हिंदुस्थाना-

मध्यें कोण लोक होते आणि त्यांच्या काय उलाढाली चालल्या होत्या हें पाहिलें तर या सर्व स्मृतींतील फक्त कालभेदच पाहून भागेल असें वाटत नाहीं. या वेगवेगळ्या स्थळींच्या आणि वेगवेगळ्या लोकांच्या असण्याचा संभव नाहीं असें मला वाटत नाहीं; कारण कीं यावेळीं वेगवेगळे लोक इतके स्वतंत्र होते कीं, त्यांनीं स्वतःच्या कालगणनेकरितां वेगवेगळे शक सुरू केले. विक्रमसंवत्, शालिवाहनशक, वल्लभीशक, परशुराम शक इत्यादि सर्व शक याच कालांत पडतात. त्याप्रमाणेंच वेगवेगळ्या लोकांनीं आपले वेगवेगळे स्मृतिग्रंथ केले असल्यास, त्या सर्व लोकांना एक म्हणावयाचें असल्यास त्यांचे जातिजनपदधर्म (प्रो. चा शब्द वापरतो) वेगळे असूनही त्यांचे मूळ वेदांत आहे असें समन्वयानें सांगावयास नको कां ! नाहींतर ऐतिहासिक पद्धतीनें एकीकृतांचें पृथक्करण होऊन विघटन मात्र होईल. येथें प्रोफेसरसाहेबांच्या नजरेस एक गोष्ट आणावयाची ती अशी कीं, धर्मग्रंथांचीं प्रतीकें म्हणून जीं वाक्यें ब्रह्मयज्ञांत गुंफिलीं आहेत त्यामध्यें स्मृतींचें प्रतीक 'योगीश्वरं याज्ञवल्क्यम्' असें याज्ञवल्क्य स्मृतीचें आद्य वाक्य आलें आहे. परंतु 'यद्वै मनुरब्रवीत् तद्भेषजम्' असें वाक्य श्रुतींतही आलें असून ब्रम्हयज्ञामध्यें याज्ञवल्क्याला प्राधान्य कां मिळालें असावें याचा विचार व्हावयास पाहिजे. ह्याचें कारण कालभेदच असेल अगर दुसरा कांहीं म्हणजे स्थानभेद, लोकभेद असण्याचा संभव आहे ही शक्यता लक्षांत घ्यावयास पाहिजे. म्हणून आम्हीं म्हणतों परात्पर गुरु जे पाश्चात्य त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून निव्वळ काळदृष्टय विचार करणें हें प्रो. काणे यांना युक्त नाहीं.

**संस्कृति प्रसाराच्या पद्धती**

जगताच्या पाठीवर संस्कृतीप्रसाराचे आणि सादृश्यीकरणाचे दोन मार्ग असलेले दिसून येतात. एक आर्यांचा आणि दुसरा सेमेटिक धर्मांच्या प्रसाराचा. जो काळ त्यांनीं स्मृतीवाङ्मयाच्या वाटणीवर घातला आहे त्या काळीं जगांत एक अपूर्व क्रांति होत होती. तत्पूर्वी सर्व जगतामध्यें स्थानीय देवता, जानपद देवता वगैरे देवदेवतांनीं युक्त असे धर्म पसरलेले होते. त्याप्रमाणेंच राष्ट्रजातींचीं वेगवेगळीं दैवतें,

त्यांचे वेगवेगळे उपाध्याय वगैरे सर्व जगभर पसरले होते. त्याप्रमाणेंच सृष्ट चमत्कार, संहारक नाग, पशुपक्ष्यादींच्या देवता याही बहुत होत्या. ह्या सर्व तऱ्हेच्या देवतांचा आणि उपासनांचा नाश होण्याचा काळ सुरूं होऊन त्या ठिकाणीं वैयक्तिक विचारानें प्रेरित झालेले संप्रदाय पुढें येत होते. या काळांतच गौतमबुद्ध, महावीर, झरदुष्ट्र, येशू आणि महंमद या सांप्रदायिकांचा उदय झाला. पहिले तीन आर्य परंपरेंतले असून शेवटचे दोघे सेमेटिक परंपरेंतले होते.

प्राचीन काळ घ्या, अर्वाचीन काळ घ्या, मानवाचीं वैयक्तिक वा सामुदायिक परिभ्रमणें चालूंच असतात. समाजांचे परस्परावर परीणाम घडतच असतात. कांहीं व्यापार उदीम करण्याकरितां जातील, कांहीं जेते म्हणून जातील. परंतु समाजाचा एकादा थोडासा भाग नेहमींच फिरता असतो. बाकीचा बहुतेक मानव स्थिरच असतो. देश पूर्ण वसलेला आणि भरून गेलेला असेल तर त्यांत हालचालींना फारशी जागा नसते. ज्या लोकांच्या हालचाली होत त्यांचे बावतींत दोन क्रिया चालूं असत. त्या क्रिया होण्याचें कारण तरी प्राचीन संस्कृतींतील कोणत्याही अंगाचा नाश न करतां दोन संस्कृतीचा मिलाफ करण्याची जी पद्धति आर्यांनीं अवलंबिली होती तीच होय. एक क्रिया म्हणजे आपल्या देवाचें अगर देवतेचें दुसऱ्यांशीं ऐक्य स्थापन करावयाचें. म्हणजे तद्देवतामूलक आचार विभक्त राहिले तरी संस्कृति एका छत्राखालीं येई. त्याबरोबरच जर इतरांच्या एकाद्या देवतेसारखी देवता आपल्या दैवत ग्रामांत नसेल तर ती देवताच दत्तक घेऊन टाकावयाची. त्याप्रमाणेंच दैवतांचा आचार्यवर्गही बराचसा सदृश होता. आयर्लंडमध्ये ड्रेशॉन होते. इंग्लंदमधील ड्रुईड वर्ग अग्नीला आहुति देत असे. इराणांतील मग वर्ग अग्न्युपासक आणि सूर्योपासक होता. ह्या सर्व देवदेवता आणि आचार्य यांचेमुळें धार्मिक मत्सर अतिशय कमी होता.

तदितर जी ख्रिस्ती आणि महंमदी पद्धती त्या पद्धतींनीं एकच देव आहे असा आग्रह धरल्याकारणानें दुसऱ्याचे देव फोडणें हेच त्यांना मह-

आग्रही धर्म

त्याचें कर्तव्य वाटूं लागलें. त्यामुळें दैवत-विषयक धर्मनष्ट झाल्याकारणानें प्राचीन संस्कृति, अगर चालीरीति अगर परंपरा यांपैकीं कांहींच शिल्लक राहिलें नाहीं. स्थानिक संस्कृति नष्ट झाल्यानंतर इतिहासामध्यें स्थानभेद किंवा लोकभेद असा कांहींच राहिला नसल्यामुळें संस्कृतीचा इतिहास फक्त कालभेदानेंच दर्शविणें शिल्लक राहिले. कांहीं ठिकाणीं कांहीं स्थानिक देवता राखलेल्या दिसतात. खिस्त्यांनीं आपल्या जुन्या देवतांना सेंटस बनविले. तुर्कस्तानांत अजून पूर्वींच्या स्थानिक देवता आहेत. हिंदु दैवतग्रामाचें पृथक्करण केल्यास असें दिसून येईल कीं, वैदिक देवतांशीं सदृश अशा सुमेरी, बाबिलोनी आणि आसुरी देवता होत्या. अशा तऱ्हेचा दैवतमूलक धर्म, सांप्रदायांच्या लोंढ्यापुढें सर्व जगांतून नष्ट झाला, तो फक्त हिंदुस्तानांतच शिल्लक राहिला. या क्रांतीच्या पूर्वीं सर्व जगांत असाच स्थानिक देवदेवतांचा, स्थानिक पुरोहितांचा, नैसर्गिक शक्तींच्या देवतांचा धर्म होता. सुमेरियन लोकांना देवदेवता होत्या, खाल्डियन लोकांना देवदेवता होत्या, इजिप्शियन लोकांना देवदेवता होत्या, चिनीलोकांना देवदेवता होत्या, असुरी लोकांना देवदेवता होत्या. हे सर्व दैवतमूलक धर्म पृथ्वीच्या नकाशावरून पुसून गेले आणि फक्त हिंदुस्थानांत दैवतमूलक धर्म राहिला हा सत्य इतिहास असून प्रो. काणे म्हणतात, "ग्रीक व रोमन लोक विनाश पावले, आमचा समाज मात्र अजून जिवंत अशी प्रौढी रा. जोशी यांनीं मारली आहे, पण हा त्यांचा निव्वळ भ्रम आहे" (पा. २८५). ग्रीक आणि रोमन लोकांना देवदेवता होत्या, यज्ञ होते, त्याप्रमाणेंच उपाध्याय होते. ती दैवतमूलक संस्कृति या सर्व लोकांतून नष्ट झाली आणि आमच्यामध्यें शिल्लक राहिली, तरी आम्ही प्रौढी मारूं नये असा प्रो. काणे आम्हांला आग्रह करीत आहेत. परंतु हा मुख्य फरक सोडून देऊन प्रो. काणे यांनी भाषा वगैरे इतर बाबतींत पांडित्य केलें आहे (पा. ३८५). तें मुख्य मुद्दा नजरेआड करण्याकरतां असावें असा जबर संशय येतो. वसिष्ठ वामदेवांना वादांत ओढून आणणाऱ्या प्रो. काण्यांना असा प्रश्न विचारतों कीं, देवीच्या उपासनेंतील नवार्णव मंत्रांपैकीं "ॐ ऐं ह्रीं क्लीं चामुण्डायै विच्चे श्रीं श्रीं श्रियं नमः।" क्लीं ही देवता वसिष्ठ वामदेवांना माहिती होती काय ! नव्हे

आज त्यांनीं तरी ती देवता कोठून आली याचा खुलासा करावा अशी त्यांना शिष्यभावानें विनंती आहे. प्रो. काणे विचारतात " इंद्र, वरुण, अश्विनौ यांचीं देवळें त्यांना दिसतील काय ? " (पा. २८५). हेच काणे मागें पा. १५४ वर लिहितात " कारण त्या वेळीं आपणाकडे देवळेंच नव्हतीं. इंद्र, वरुण, बृहस्पति, मरुत्, अग्नि हे तेव्हांचे देव असून त्यांच्या मूर्ति नव्हत्या व अर्थात् त्यांच्यासाठीं देवळेंहि नव्हतीं. मूर्ति व देवळें बुद्धकालाच्या सुमारास आपल्याकडे उत्पन्न झालीं " आतां पहा किती समतोल बुद्धीनें लिहिलेला हा ग्रंथ आहे. अहो साहेब जर या देवतांचीं देवळें नव्हतीं तर आतांहि नसलीं तर वसिष्ठवामदेवांना कां वैषम्य वाटावें ? त्यांच्याबद्दल मनांत आदर नसता तर आम्ही स्पष्ट म्हटलें असतें कीं, प्रो. साहेबांना धर्मशास्त्रांत एक अक्षर देखील समजत नाहीं. अशाच तऱ्हेचे प्रश्न विचारून पुढें प्रो. सांगतात " तात्पर्य आम्ही जीवंत आहों या जोशांच्या प्रौढींत मला तर विशेष अर्थ दिसत नाहीं " (पा. २८६). प्रो. काणे यांची निरीक्षण शक्ति काय स्वरूपाची आहे, त्याचें दिग्दर्शन वरील चर्चेंत आलेंच आहे.

देवदेवतांचा विचार झाल्यानंतर मग लोकविषयक विचार उत्पन्न होतो. प्रो. काणे यांनीं उद्धृत केलेल्या खारवेलच्या आधारावरून आम्हीं असें

### लोक

दाखविलेंच आहे कीं, गौतमबुद्धाच्या काळीं हिंदुस्थान देश आजच्या प्रमाणेंच पूर्ण भरलेला होता. म्हणजे त्यानंतर मोठमोठाल्या लोकसमूहांच्या हालचालींना फारशी जागा नव्हती. तत्पूर्वीं किती काळ हा हिंदुस्थान देश भरलेला असेल हें कसें सांगतां येईल ? परंतु आर्यांची विषम समाजांत आणि संस्कृतींत खटका होऊं न देतां त्यांचें संगतीकरण करून घेण्याची पद्धति समजावून घ्यावयाची तर आपणाला लोकभ्रमणाची थोडीशी तरी चर्चा करावयास पाहिजे. आमचें असें दुर्दैव कीं, आमच्यांतील या महापंडिताला या गोष्टीची जरूर भासली नाहीं. वैदिक काळापासून मानव हालचालींचा विचार करावयाचा तर सर्व जगांतील हालचालींचा पूर्णत्वानें विचार करावा लागेल, परंतु तसें न करितां आपण आपलीं दृष्टि असिरिआपासून बंगालच्या उपसागरापर्यंतच ठेवूं. अगदीं वेद-

१२३९

काल घेतला तरी ज्यावेळीं मंत्र संस्कृतीचे लोक पंजाबांत उतरून, हळूहळू आर्यावर्तांत पसरूं लागले, त्यावेळीं कीकटामध्यें मग नांवाचे ज्यांचे उपाध्याय आहेत असे लोक होते. हे लोक कोण असावेत? मग हे शक आणि इराणी या दोघांचेही उपाध्याय आहेत. गौतमबुद्धाचें शाक्यसिंह हें नांव प्रसिद्ध आहे. त्याबरोबरच कुरुयुद्धकाळचा भारतभूमीचा नकाशा पुढें आल्याबरोबर मगधामध्यें महाप्रतापी सम्राट जरासंघ हा असुर असल्याचें दिसून येतें. तो इतका प्रबळ होता कीं, त्याच्या माऱ्यापुढें कंटाळून शूर-सेनांतल्या बलराम कृष्णादि प्रबळ यादवांनीं मथुरा ही राजधानी सोडून 'वसविली जळांत द्वारावती.' त्या असुरांचे अगर शकांचे उपाध्याय हे यज्ञकर्तेच होते. त्यांची यज्ञपद्धति आणि मांत्रसंस्कृतीच्या लोकांची यज्ञ-पद्धति एकच होती काय? तशी नसल्यास या दोन पद्धतीपैकीं एक नष्ट होऊन दुसरी शिल्लक राहिली अगर दोन्हीही यज्ञपद्धती संगतीकरणांत शिल्लक राहिल्या असे दोन पक्ष संभवतात. दोन्हीहि शिल्लक राहिल्या असल्यास आज चतुर्वेद एकाच लोकांचे आहेत असें सांगितलें जातें ती गोष्ट खरी नसावी असें वाटतें. पुन्हां या असुर संस्कृतीच्या लोकांत देवळें होतीं किंवा नव्हतीं हें आपणास कसें सांगतां येईल. असुरांच्या इतर प्राचीन लोकांप्रमाणेंच देवदेवता होत्या. त्यांतील कांहीं पुढीलप्रमाणें (१) नेरगल–नरकदेवता (२) नबू–विद्याधिपति (३) एकर्त–युद्धदेव (४) बेलमार्डुक–देवांचे अगोदरच्या देवांशीं युद्ध चालले असतां देवांचा पुढारी (५) लख्मु–मोठा सर्परूपी देव–लक्ष्मण हा शेषाचा अवतार होता असें म्हणतात. या सर्व देवतांच्या त्यांतल्या त्यांत पांचव्या देवतेच्या मूर्ती नव्हत्या असें म्हणण्याला खरोखर कांहींच कारण नाहीं. ती नागपूजा आज देखील चालू आहे. बुद्धपूर्वकाळीं हिंदुस्थानांत देवळें नव्हतीं असें पाश्चात्य गुरु 'आदिष्टवान्' आणि 'तथालिखितवान् ग्रंथे प्रबुद्धो' प्रोफेसर. या मागधीय संस्कृतीचा मांत्र संस्कृतीशीं मिलाफ झाल्यानंतर ब्राह्मणांच्या समाजविस्तारक नियमानें त्यांचा धर्मग्रंथांत संग्रह झाला म्हणून त्यांत धर्मपरिवर्तन झालें नाहीं. असो. मांत्र संस्कृतीचे लोक पंजाबांत आल्यानंतर थोडेसे देशांत पसरूं लागले. परंतु पंजाबांतील लोक सुसंस्कृत झाले नाहींत आणि त्यांचे आचारहि सुधारले नाहींत. त्यामुळें आदर्श आचार कोणाचे हें सांगतांना

मनु पंजाबाचे आचार न सांगतां इतर देशांचे आचार सांगतो. त्याप्रमाणेंच हिंदूंचे एकही पवित्र क्षेत्र पंजाबांत नाहीं ही गोष्टहि येथें नमूद करतों. जसें हे असुर शकादि लोक मगधांत होते असें मानण्यास पुरावा आहे त्याप्रमाणेंच कीकट देशावर पूर्वेकडील लोकांनीं स्वारी केली असावी आणि मगधांत जातिमिश्रण झालें असावें असें पार्गिटर म्हणतो. ‘कोसल, विदेह, अंग, मगध या देशामध्यें वसाहत फार प्राचीनकाळीं पूर्वसमुद्रमार्गानें झाली असावी आणि त्यांच्या संस्कृतीचें प्राचीन अवैदिक स्वरूप वेदकाळीं देखील राहिलें असावें’ (प्राचीन महाराष्ट्र) वेदपूर्वकाळींच हिंदुस्थानांत शक, असुर, मग, कैकय ( इराणी ) हैहय वगैरे लोकांचीं आगमनें झालीं होतीं. इतका प्रपंच करण्याचें कारण इतकेंच कीं, हिंदुराष्ट्राचे वेदकालीन आचार फक्त वेद दहावेळां वाचून देखील सांगणें शक्य नाहीं. कारण इतर देशांप्रमाणें हिंदुस्थानांत स्थानिक, जातीय, दैवतमूलक आचार नष्ट न होतां उदारमतवादी आर्यसंस्कृतीच्या छायेखालीं सुस्थित राहिले. त्यामुळें जातीय परिभ्रमणांचा इतिहास सांगण्यास हिंदुस्थानांत जितका भरपूर पुरावा आहे तितका इतरत्र नाहीं. त्याचें कारण डॉ. केतकर पुढीलप्रमाणें देतात ‘ याचें कारण हिंदूमधील जातिभेद आहे, हें मागें सांगितलेंच आहे. निरनिराळ्या काळीं निरनिराळे लोक आले, त्यांचे पूर्वगत लोकांशीं एकजीव झाले नाहींत आणि त्यामुळें ते जातीतिहास रक्षून आहेत ’ (पा. ३३८) येथें आणि इतरत्रही डॉ. केतकर सांगतात कीं, कित्येक सहस्रकें हिंदुस्थानांत अनंत जाती होत्या, तर विचारशील पक्षाचे अध्वर्यु प्रो. काणे सांगतात कीं, चाराच्या चार हजार जाती झाल्या. आजच्या विविध ब्राह्मण जाती एकाच जातीच्या उपजाती आहेत असें म्हणणारांना पुराणवस्तुसंशोधन खात्याचे प्रो. बानर्जी सांगतात, ‘ समाजांतील खालच्या थरांनीं उपासना तीच ठेविली. त्यांचे उपाध्याय तेच राहिले. ते स्वतःला पुढें ब्राह्मण म्हणूं लागले आणि ब्राह्मणांतील हलक्या जाती होऊन राहिले ’ दि हिस्टॉरिक एन्शन्ट अँड हिंदू इंडिया (पा. ३८). तेच पुढें म्हणतात ‘ बंगाल, बिहार, ओरिसामधील फारच थोडे ब्राह्मण इंडो-आर्यन रक्ताचे आहेत ’ ( पा. ३७ ). अहमदाबादेपासून बंगालपर्यंत सांपडणारे शाकद्वीपि ब्राह्मण, श्रीमाळी ब्राह्मण, आंगिसर ब्राह्मण, आचार्य ब्राह्मण वगैरे कोण आहेत

याचा खुलासा व्हावयास पाहिजे. महाराष्ट्रांत सोनाराचा धंदा करणारी परंतु स्वतःला दैवज्ञ म्हणविणारी जी जाति आहे तिला दैवज्ञ हें नांव कोठून आले. दैवज्ञ म्हणजे फलज्योतिष सांगणारा, सोनार नव्हे. त्याप्रमाणें आंगिरस ब्राह्मणाचे फलज्योतिष आणि वैद्यक हेच धंदे आहेत. शाकद्वीपि ब्राह्मण असें म्हणतात कीं प्रो. काण्यांची कोकणस्थ जाती ही आमच्याच वंशांतील आहे. पूर्वीचे मग हे फलज्योतिषी होते ही गोष्ट बाणभट्टाच्या काळापर्यंत माहिती होती. असो, ऐतिहासिकानें जी देश, काल, लोकविषयक दृष्टी लावावयास पाहिजे म्हणून सुरवातीलाच सांगितलें त्याप्रमाणें प्रो. काणे यांनीं मुळींच न लावतां आचारग्राम वाढला कीं धर्मपरिवर्तन झालें असें ठोकून दिलें आहे. त्यांची सर्व पद्धतीच अशी सदोष आहे. आतांपर्यंतचा निष्कर्ष म्हणजे दैवतमूलक धर्म, जातिमूलक आचार, देशमूलक आचार हे सर्व संरक्षून ठेवणारा समाज हिंदूसमाजच आणि त्याचे समकालीन सर्व समाज या दृष्टीनें मृत झाले आहेत आणि ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. आज भिन्नांचा नाश करून अभिन्नत्व उत्पन्न करणाऱ्या संस्कृतीचा बोलबाला झाला असल्याकारणानें भिन्नत्व ठेवून अभिन्नत्व उत्पन्न करणारी संस्कृती आज उठाव दिसत नाहीं इतकेच.

त्यांची मूळ दृष्टीच सदोष असल्याकारणानें त्यांनीं हिंदुधर्मासंबंधीं काढलेले सिद्धांत त्यांनीं सांगितल्याप्रमाणेंच डोळे फाटून जाण्यासारखे आहेत.

**प्रसरणपद्धति**

इतर धर्मापासून हिंदुधर्माची व्यावृत्ती सांगतांना प्रो. काणे सांगतात ‘ इतर धर्म आपल्याप्रमाणें सर्वांना करून घेण्याचा आग्रह धरतात, पण हिंदुधर्म इतर धर्मीयांनीं आपल्यासारखे होऊं नये असें म्हणतो, हा त्याचा दुसरा विशेष आहे ’ ( पान ४ ). आम्हीं वर दाखविलेंच आहे कीं, इतर धर्म भिन्नत्वाचा नाश करून ( method of extirpation ) अभिन्नत्व उत्पन्न करतात, हिंदुधर्म भिन्नांच्या संगतीकरणानें ( method of absorption) अभिन्नत्व उत्पन्न करूं पहातो. तसें करण्याला काय युक्त्या करीत? त्यांपैकीं कांहीं प्रोफेसरसाहेबांना माहीत आहेत. ते म्हणतात, ‘ हिंदुस्थानांत भिन्न पंथाचे लोक आहेत हें खरें, पण त्या सर्वांना एकत्र गोंवणाऱ्या तीन महत्त्वाच्या गोष्टी आहेत. पहिली म्हणजे संस्कृत ही धर्मभाषा आहे. दुसरी

म्हणजे सर्वसाधारण संस्कृति पंथ भिन्न असले तरी त्यांच्या सामान्य चाली-रीति एकाच सांच्याच्या आहेत' (पान ४।५ ). हेंच 'अविभक्तं विभक्तेषु' नव्हे कां ? येथें त्यांनीं दिलेला इतिहास मात्र विचित्र आहे. बौद्ध, जैनांची धर्मभाषा संस्कृत आहे असें ते म्हणतात. परंतु ती संस्कृत कशी झाली त्याचा इतिहास ते देत नाहींत. या धर्मांच्या अगर पंथांच्या धर्मभाषा पाली, अर्धमागधी वगैरे प्राकृतभाषा होत्या. त्यांना चीत करून संस्कृतभाषेचें महत्त्व पुन्हा कोणी स्थापन केलें याचा सर्व इतिहास प्रो. साहेबांनीं सांगावा अशी त्यांना अत्यंत आग्रहाची विनंति आहे. त्यावेळीं जर मुंबई विश्व-विद्यालयाचे पदवीधर असते तर ते म्हणाले असते कीं, अहो लोकांना संस्कृतभाषा समजत नाहीं, काय करावयाचें आहे भानगडी करून, प्राकृत भाषांतून काय ज्ञान होत नाहीं. एकंदर राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें पाली, अर्ध-मागधी, पैशाची वगैरे भाषाच पसरणें खरोखर इष्ट आहे. परंतु त्यावेळीं ब्राह्मणांत वेडे सनातनी म्हणजे प्रो. काण्यांच्या कालगणनेनें सर्व सूत्रकार, सर्व स्मृतिकार, पतंजली कात्यायनासारखे वैय्याकरण, कौटिल्यासारखे अर्थशास्त्रज्ञ, कुमारीलासारखे मीमांसक आणि या तारकामध्यें त्यांना गतप्रभ करणारा तत्त्वज्ञान्यांचा अग्रणी महान तेजस्वी सूर्य, व विवर्तवादी शंकर या सर्वांनीं संस्कृत भाषेंत ग्रंथरचना केली आणि म्हणून आज संस्कृत दैवी वाक् म्हणून प्रो. काण्यांना पुढें मांडतां येत आहे. या महान् पंडिताचें सेमेटिक लोकांच्या उच्छेदक पद्धतीवर इतकें प्रेम बसलें आहे कीं, त्यानें हिंदूंच्या सर्व देवदेव-तांचा ( Hindu pantheon ) उच्छेद करून फक्त दोनच देवता अग्नि आणि सूर्य या ठेवाव्या असें सुचविलें आहे (पा. ३४). स्मृतिग्रंथ वाचलें तरी अंतःकरण सेमेटिक पद्धतींनीं व्यापल्यावर दुसरें काय सांपडणार ? आज मुसलमान आणि ख्रिस्ती तरी तेच म्हणत आहेत. कीं बाबांनों हे सर्व खोटे देव टांकून एकाच खऱ्या देवाला भजा. आतां हिंदूंतीलच विचारशील ऐतिहासिक सुधारकांपैकीं एकजण खोटे देव टाकावयास सांगूं लागला, मग आतां एक देव होण्याला किती वेळ लागणार ? त्यालाच अल्ला असें नांव दिलें म्हणजे झालें. What is their in a name ? या दोन देवता कां मानाव्या याला त्यांनीं सांगितलेलें कारणही तऱ्हेवाईक आहे. 'अग्नि आणि सूर्य याशिवाय आपणाला नुसतें जगतांही येणार

नाहीं ' (पा. ३४). परंतु हे कारण देवत्वाला पुरें मानल्यास अग्निदेवता, जलदेवता, पर्ज्यन्यदेवता वगैरे सर्व देवता पुन्हां मानणें जरूर पडेल. शिवाय सूर्यानें वाटले तर उगवूं नये, आम्ही कांहीं त्याला तसा आग्रह केला नाहीं. अग्निशिवाय जगतां येत नसल्यास डार्विनोक्त प्रोफेसर काण्यांचे रानांत पानें ओरबडणारे आणि फळें तोडणारे जे पूर्वज त्यांच्यापेक्षा प्रो. काणे यांची फारच अधोगती झाली आहे. कारण ते पूर्वज अग्निशिवाय रहात असत. अशा हिंदू देवतांचें भंजन करावें असें म्हणणाऱ्या या प्रच्छन्न सेमेटिकानें आमच्यावर अधिक्षेप करण्याकरितां पुढील वाक्य घेऊन त्यांत जातां जातां श्रीमदाचार्यांवर शिंतोडे उडविले आहेत. ' हिंदूनें जातीय आचार आणि नैतिक मूल्यें बरोबर पाळल्यास आध्यात्मिक बाबतींत तो...... महंमद... वगैरे यांपैकीं कोणाचाही अनुयायी असूं शकेल ' (पा. २९८). आध्यात्मिक बाबतींत स्वातंत्र्य हा तर हिंदूचा पहिला नियम आहे. परंतु सर्व देवांचा विध्वंस करून दोनच शिल्लक ठेवणें हें मात्र हिंदूपरंपरेविरुद्ध आहे.

दुसऱ्या व्याख्यानाच्या सुरुवातीला प्रो. साहेब म्हणतात, ' पहिल्या व्याख्यानांत हिंदूधर्म म्हणजे काय व त्या धर्माचें मूळ कोणते याचा विचार झाला ' (पा. ९). हिंदू धर्म म्हणजे काय, त्याची परंपरा कोणती या बाबतींत त्यांचे किती गैरसमज आहेत हें आतांपर्यंत केलेल्या चर्चेवरून विशद झालें असेल. धर्माचें मूळ कोणतें याचाही त्या व्याख्यानांत विचार झालेला दिसत नाही. त्यांत त्यांनीं श्रुति, स्मृति, सदाचार आणि सम्यक्संकल्पज काम अशी चार मूळें सांगितलीं आहेत. या चारांशीं काडीचाही संबंध नसलेले आणि सुप्रतिष्ठित असें आचारग्राम हिंदू समाजांत आहेत. ते हिंदूच नव्हेत असें त्यांना म्हणावयाचें आहे काय ? भारतीयामध्यें तंत्रधर्म गौतम-बुद्धाच्या आधीच्या काळापासून रूढ आहे. त्याप्रमाणेंच पौराणधर्महि रूढ आहे. त्याप्रमाणेंच जुन्या आसुर धर्मांशीं सदृश अशा भुतें काढणारे पंचाक्षरी, क्षुद्रदेवता आणि मुरळ्या देवदासीसारख्या चाली आजही शिल्लक आहेत. देवीमहात्म्यांतील सप्तशतीचा पाठ करणाराला डाकिनी, शाकिनी, भैरवी वगैरे जीं नांवें सांपडतात तीं कशीं आलीं ? परंतु खरी गोष्ट अशी आहे कीं, प्रो. काणे यांना मानवाच्या हालचालीचें पृथक्करण करून धर्म-मीमांसा करावयाची नसून त्यांनीं जे ग्रंथ वाचले त्यावरून बोध करून

८

घ्यावयाचा आहे आणि तेच काणे आमच्याबद्दल म्हणतात 'रा. जोशी नुसते पुस्तकपंडीत दिसतात' (पा. २९०). आम्हाला खरोखर एकरूप झालेल्या संस्कृतीचे पृथक्करण करण्याची मनापासून इच्छा नाहीं, परंतु आधुनिकांच्या विकृत ऐतिहासिक दृष्टीकोनामुळें तें सर्व करणें प्राप्त झालें आहे. पुन्हां धर्ममूलामध्यें पुराणांचा अंतर्भाव न करतां पुढें तें प्रमाण त्यांनीं मानलेंच आहे. याला म्हणतात समतोल बुद्धी. श्रौतधर्म, स्मार्तधर्म, पौरणधर्म, तंत्रधर्म वगैरे सर्वच एकाच लोकांच्या धर्मविकासनाच्या पायऱ्या आहेत, बहुत लोकांच्या धर्मांचा मिलाफ नाहीं असें मूळांतच धरल्याकारणानें त्यांना बारीक सारीक गोष्टी देखील अडूं लागल्या आहेत. मग ते कित्येक आचारांचे मूळ वेदांत शोधूं लागले त्यामध्यें त्यांना सर्व मानवजातीला समान असे विवाह, पुत्रोत्पत्ती, निपुत्रिकाची व्यवस्था, दायभाग, स्त्रियांची व्यवस्था वगैरे विषयक कांहीं आचार सांपडलेही. त्यांनीं कोणत्याही लोकांचा धर्म चाळला तरी त्यांत हे साधारण विषय सांपडतीलच. श्रुतिविरुद्ध श्रुति आल्यास विकल्प प्रोफेसर देतात. परंतु आमची अशी शंका आहे कीं, श्रुतिविरुद्ध श्रुति अशी परिस्थितीच कां झाली ह्याची ऐतिहासिक मीमांसा सांगा. आम्ही म्हणतों तें श्रुतिद्वैविध्य नसून ते मतपरिवर्तन आहे आणि मतपरिवर्तनाला प्रत्यक्ष श्रुतींत आधार आहे. अरे सन्यातन्यानो, धर्ममार्तंडानो, नित्शेच्या चेल्यानों हें पहा श्रुतींत मतपरिवर्तन. शंका इतकीच श्रुतीसमुच्चय हे एकाच स्थळींचे आहेतना ? तीच गोष्ट सर्व द्वैतांना लागू. म्हणूनच तर प्रोफेसर सांगतात 'पूर्वींच्या धर्मशास्त्रांत तर्कशास्त्राचा अवलंब सर्वत्र केलेला आढळतो' (पा. २७). तर्कशास्त्राचा अवलंब केलेला नसतो असें आमच्यासारखे कधींच म्हणत नाहींत. आमची तक्रार असते ती इतकीच कीं, मूलतत्त्व अगर प्रतिज्ञा तर्कशास्त्रानें घेतात कां ? धार्मिक तर्कशास्त्रांत प्रधान कोणतें ? प्रतिज्ञा कीं उदाहरण ? म्हणजे कोणत्याही चर्चेला सुरवात करतांना Major premiss तर्कशास्त्रानें काढतां येईल किंवा काय इतकेंच ! या सर्व कारणामुळें आणि त्यांच्या पुस्तकी पांडित्यामुळें त्यांनीं धर्मग्रंथाचें जें एक कडबोळें बनविलें आहे तें फार खुमासदार झालें आहे आणि ते फारच निःपक्षपाती असल्याकारणानें स्मृतीच्या अप्रमाणत्वाच्या बाबतींत आलेले 'हेतुदर्शनाच्च'

एवढें सूत्र नेमकें त्यांनीं गाळलें आहे. शिष्टाचाराच्या चर्चेत देखील त्यांनीं फारच बहार करून सोडली आहे. ते म्हणतात 'ऐतिहासिक दृष्टि सोडून दिल्यास आपल्यामध्यें किती सनातनी राहतील याचा सनातनी म्हणविणारांनीं विचार अवश्य केला पाहिजे' (पा. २४–२५). सनातनी अवश्य विचार करतील, परंतु त्यांनीं दिलेलें कारण मात्र विचाराला पुरेसें नाहीं. त्यांनीं मनूनें द्विजातीला रहाणीच्या दृष्टीनें योग्य देश सांगून बाकीचे म्लेंच्छ देश म्हटल्याचें सांगितलें आहे. ती गोष्ट आम्हांलाही मान्य आहे. परंतु चहूंकडून संगत होणाऱ्या सर्व लोकांकरितां तो धर्म लिहीत नव्हता, तर तो ज्या परंपरेंतील होता त्या म्हणजे मुख्यतः मांत्र संस्कृतीचे लोकांकरितां लिहीत होता. असाच खुलासा बाकीच्या सर्व वचनांचा आहे. त्यांतील तत्त्व आगमन–निर्गमन आणि परिभ्रमणें सारखीं करूं नयेत इतकेंच आहे. या बाबतींत आमच्या ग्रंथांतील मुद्यांवर रा. काणे यांनीं बरेंच पांडित्य केलें आहे. तरी पुनरपि प्रो. काणे यांना सांगतों कीं, वंशांनीं आपलें वसतिस्थान सोडूं नये नाहीं तर त्यांचा नाश होतो. असो. त्यांनीं मूळांत धर्माचीं मूळें पुरतीं घेतलीं नाहींत आणि पुढेंही देशभिन्नत्व थोडेसें मानलें असलें तरी लोकभेदाचा फारसा विचार केलेला दिसत नाहीं. तरी आमचा अधिक्षेप करण्याकरितां ते आमचीं वाक्यें उतरून घेतातच. त्यांपैकीं पुढील एक आहे. 'मग जो राजसत्ता मिळवितो तो राजा. ते राजे इतर राजांशीं वांशिक दृष्ट्या भिन्न असले तरी–विवाहसंबंध करीत. हा संकर आणि युद्धाचे नैसर्गिक परिणाम, या कारणांनीं क्षत्रियवर्ण अगर जाति कधींच निर्माण झाली नाहीं' (पा. २९८). पण यांत आम्ही अपसिद्धांत काय लिहिला आहे. प्रो. काणे सांगतात 'उत्तरेकडे ब्राह्मण राजघराणीं कित्येक होऊन गेलीं असें इतिहासावरून दिसतें. अजंठ्याच्या लेण्यांत ज्यांचा उल्लेख आहे ते वाकाटक घराणेंही ब्राह्मण होतें' (पा. ३१). त्याप्रमाणेंच कदंब घराणेंही ब्राह्मण होतें. कित्येक राजघराणीं वैश्य होतीं. असा स्पष्ट इतिहास त्यांनाच माहीत असून त्यांना आमचा सिद्धांत चूक कां वाटावा ? याला कारण त्यांचा अत्यंत निःपक्षपातीपणाच असला पाहिजे.

असो. ऐतिहासिक पद्धतीनें समाजशास्त्राचा अर्थ लावतांना ज्या

गोष्टींचा विचार करावयास पाहिजे त्यांचा मुळींच न करतां फक्त वाङ्मयाचा विचार केल्यामुळें त्यांना जेथें तेथें धर्मपरिवर्तन दिसूं लागेल. परंतु त्याचा खरा अर्थ असा आहे कीं, जसजसा जास्त जातींचा संस्कृतिसादृश्यानें गटांत समावेश होत गेला, तसतसा त्या लोकांचा आचारग्राम वाढत गेला आणि तो पुढें वेगवेगळ्या धर्मग्रंथांत उल्लेखिला गेला यांत परिवर्तन वगैरेचा कांहीं संबंध नाहीं. दोन परस्पर भिन्न चाली असलेल्या लोकांचा अंतर्भाव झाल्यास दोनही चाली उल्लेखिल्या जातील. परंतु त्या ज्याच्या त्यालाच लागू. म्हणजे या दोनही चाली विकल्परूपानें ओळखिल्या जातील. मांत्र संस्कृतींतील ग्रंथकार, त्या संस्कृतींतील लोकांच्या इतर शाखांतील लोकांप्रमाणेंच, फक्त वडील मुलानेंच पितृद्रव्य घ्यावें असें म्हणेल, दुसऱ्या परंपरेंतील ग्रंथकार द्रव्य सर्व वारसांमध्यें वाटावें असें म्हणेल. मग सर्व विभिन्न संस्कृतींचें एकीकरण करतांना सर्व विभिन्न आचारांचें मूळ वेदांत आहे असें चिकटविलेलें नातें परमार्थतः लोक मानूं लागण्याइतका काळ आल्यानंतर आचारांचा संकोच होऊं लागेल. एका संघाच्या पूर्वजांमध्यें असलेला आचार इतरही लोक आपल्या परंपरेशीं जुळत नसतां करूं लागले कीं, कलिवर्ज्यासारखीं प्रकरणें उत्पन्न होतील.

प्रो. काणे यांनीं सर्व इतिहास तपासण्याची खटपट केली नसल्याकारणानें त्यांचें वर्णजातिविषयक लिखाण बरेचसें दुर्बोध झालें आहे. आम्ही

**वर्ण, जाति**

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, मांत्रसंस्कृतीच्या लहानशा लोकांशिवाय इतरही बहुत लोक हिंदुस्थानांत होते आणि ते जातिसंघटनेनें रहात होते. त्यामुळें वैदिक वाङ्मयाच्या काळीं हिंदुस्थानांत फक्त चारच वर्ण होते हा मूळांतच अपसिद्धांत आहे, कारण चारच वर्ण होते असें म्हटल्याबरोबर वर्णसंस्कृतीच्या बाहेरची लोकसंख्या एकरूप होती असा अर्थ होतो. परंतु तो अर्थ खरा नाहीं. परंतु प्रो. काणे यांचा ग्रंथ हातांत घेतल्याबरोबर तेथें दोनच तऱ्हेचे गट दिसतात–आर्य आणि दास. ( पा. ५२ ) परंतु तेच काणे पुढें म्हणतात 'अनार्य अशा ज्या अनेक जातींनीं आर्यांवर स्वाऱ्या करून त्यांना हैराण केलें, त्याविषयीं मनु म्हणतो–शनकैः तु क्रिया लोपादिमा क्षत्रिय जातयः । वृषलत्वं गता लोके ब्राम्हणादर्शनेन च ॥

पौंड्रकाः चौंड्रद्रविडाः काम्बोजाः यवनाः शकाः । पारदाः पह्लवाः चीनाः किराता दरदाः खशाः ॥ ' (पा. १२४ ). या जातींनीं खरोखरच हैराण केले असेल तर, आर्य आणि दास यांशिवाय बरेच लोक त्याकाळीं होते असें दिसतें. प्रो. सांगतात कनिष्कादि परके राजे शकवंशीय होते. परंतु शक हे आर्यन भाषा बोलणारे आणि आर्यसंस्कृतीचे होते ही गोष्ट त्यांना माहीत असलेली दिसत नाहीं. ('Radical Elements in European History.' Gunther). सांगण्याचा मुद्दा एवढाच कीं, दोनच वर्ग सुरुवातीला होते असें धरून वर्णजातींचा अर्थ लावणें अनैतिहासिक आहे. पुन्हां जाति उत्पन्न होण्याची त्यांनीं सांगितलेली उपपत्ती ऐतिहासिकांना ग्राह्य होण्यासारखी नाहीं. प्रो. काणे म्हणतात 'सुतार, तेली, माळी, लोहार, गवळी, तांबट, साळी, कासार इत्यादि जाति धंद्यावरून झाल्या हें उघड आहे' (पा. ५० ) या उघड असलेल्या गोष्टीबद्दल डॉ. केतकर सांगतात 'आज ऐतिहासिक ज्ञान वाढलें असतां केवळ धंद्यावरून जाति झाल्या असें धोपट स्पष्टीकरण मुळींच उपयोगाचें नाहीं.' प्राचीन महाराष्ट्र ( पा. ३३३ ). आम्ही स्वतःही धंद्यावरून जाति पडल्या नाहींत असेंच मत दिलेलें आहे. आम्ही असें मत दिलेलें आहे कीं, गट पडण्याची म्हणजे जात्युत्पत्तीची प्रक्रिया सृष्टींतच चालू आहे. तीच व्यवस्था हिंदुस्थानांत संरक्षिली गेली म्हणजे मूळ निसर्गानेंच जाति उत्पन्न केल्या. त्यामुळें जाति ही नैसर्गिक विभागणी आणि वर्ण ही वैदिक संस्कृतींतील गटांची परिभाषा. ही वैदिकांची परिभाषा समाजभर पसरली तरी समाज हा मुख्यतः जातियुक्तच राहिला. मग वेगवेगळ्या जातींची परिगणना कोणत्या तरी वर्णांत होऊं लागली. लहानशा भागांत वसाहत केलेल्या वैदिकांची परिभाषा सर्व देशाला कोणत्याही काळीं लागू होती असें म्हणणें म्हणजे निव्वळ अनैतिहासिक हट्ट आहे. त्यामुळें जातिवर्णविषयक असें जे कांहीं लिखाण त्यांनीं लिहिले आहे तें परमार्थतः इतिहास लावण्याचें दृष्टीनें फारसें उपयोगी नाहीं. यापेक्षां जास्त प्रपंच परीक्षणांत करतां येत नाहीं. मिश्र जात्युत्पत्तीविषयीं त्यांनीं केलेली चर्चा आम्हास मान्य आहे. आर्यस्मृतिकारांना सर्व जगत् चार वर्णांत बसवावयाचे असल्याकारणानें त्यांनीं संकराची युक्ती

सांगितली. परंतु सर्व जाती संकर नव्हेत आणि संकर जाती मुळींच झाल्या नाहींत असेंही नाहीं. त्या सर्व उपपत्ति खऱ्या नाहींत असें सांगण्याकरितां त्यांनीं दिलेलीं कारणें मात्र आम्हांला मान्य नाहींत. ते म्हणतात याप्रमाणें एकाच जातीला दोन नांवें किंवा एकाच नांवाची भिन्न उपपत्ति आढळून येते. अशा रीतीनें कोणाचा कोणाशीं मेळ नसल्यामुळें या उपपत्ति खऱ्या नव्हेत असेंच उघड होतें' (पा. १२४) देशभेदानें एकाच जातीला दोन नांवें पडतात ही गोष्ट प्रसिद्ध आहे, त्याप्रमाणेंच देशभेदानें दोन अत्यंत विसदृश जातींना एक नांव पडणें हीहि प्रक्रिया या हिंदुस्थानांतच सहज दिसून येईल. या बाबतींत जाती ही नैसर्गिक प्रक्रिया आणि वर्ण ही एका लहानशा मानवसंघाची सांस्कारिक प्रक्रिया एवढा भेद लक्षांत ठेवला म्हणजे यांतील बऱ्याच घोटाळ्याचा निरास होईल.

संस्कारविषयक बाबतींत आम्हीं आणि त्यांनीं एकच लिहिलें आहे. पुढें विवाहासंबंधीं त्यांनीं जें लिहिलें आहे त्यांतील बरेच मुद्दे आमच्या ग्रंथांतही मान्य म्हणून दिले असल्याकारणानें त्यांच्याशीं मतभेदाचीं स्थळें तेवढीं सकारण देऊं. वधूच्या वयाच्या बाबतींत 'प्रदानं प्रागृतोः' हें गौतमाचें मत देऊन बहुतेक स्मृतिकारांना हा सिद्धांत मान्य आहे असें त्यांनींच सांगितलें आहे. एवढेंच करून थांबले असते तर त्यावर कांहीं लिहिण्याची जरूरी नव्हती. परंतु सुधारणेनें आणि हरदत्तानें त्यांच्या अंगांत एकदम प्रवेश केला आणि त्यांनीं सिद्धांत काढला कीं, 'सामान्यतः पहातां पंधराव्या किंवा सोळाव्या वर्षीं मुलींचीं लग्नें पूर्वीं होत असें दिसतें' (पा. ७६). असें जर दिसतें तर आज ते जें बावीस वर्षांपर्यंत वाढूं लागलें आहे तें प्रो. साहेबांना बरें दिसतें कां ? असो. या विवाहाच्या वयाच्या बाबतींत आम्ही एकूण एक शास्त्रांच्या आधारानें पुष्कळ लिहिलें आहे. परंतु त्यांतील एकाही मुद्याला प्रो. काणे हात घालण्यास धजावले नाहींत म्हणून शारदा कायद्यासंबंधीं येथें कांहींच लिहीत नाहीं. विवाहासंबंधीं ज्या उच्च ध्येयात्मक कल्पना त्यांनीं मांडल्या त्या सर्व आम्हीही पण ग्रंथांत दिल्या आहेत. वधूवरांच्या निवडीच्या बाबतींत समान संस्कृति असल्यास पोट जातींचा अडथळा मानूं नये असें जें त्यांचें मत आहे हे

अग्राह्य आहे. त्याप्रमाणेंच पुष्कळ काळामिं गोत्रप्रवरांची अडचण काढून टाकावी हें म्हणणेंहि पण अग्राह्य आहे. फलज्योतिष पाहूं नये असें प्रो. सांगतात त्यावर इतकेंच उत्तर देतों कीं, मी बाळपणापासून फलज्योतिषाचा अभ्यास केला आणि म्हणून सांगतों कीं तें शास्त्र अयुक्त आहे. त्याप्रमाणेंच संस्कृतज्ञ काण्यांना कांहीं संस्कृतविषयक शंका विचारतों. ' अग्निर्वैश्वानरः शांडिल्यगोत्रः प्राङ्मुखः ' हा वैश्वानर अग्नि शांडिल्यगोत्राचा आणि पूर्वाभिमुख कसा झाला ? ' द्विजराजः शशधरो नक्षत्रेशः क्षपाकरः ' असें अमरसिंह सांगतो. परंतु चंद्र द्विजराज कसा झाला ? ' प्रद्युम्नो मीनकेतनः ' मदन हा मीनकेतन कसा ठरतो त्याचा अर्थ लावला पाहिजे. 'शंकरः चंद्रशेखरः' चंद्रशेखर या देवतेचें स्वरूपवर्णनहि पहावयास पाहिजे. याहून आम्हाला पुष्कळ शंका आहेत परंतु आज इतक्याच पुरेत.

सतीला अनुकूल वचनें आणि विधवापुनर्विवाहाला अनुकूल वचनें एकाच ग्रंथांत दिलीं असल्याकारणानें या दोन्ही चाली सार्वत्रिक नव्हत्या असें सहज निघतें. कारण सतीची चाल सार्वत्रिक झाल्यास पुनर्विवाहाला विधवाच शिल्लक रहात नाहींत. ' विधवाविवाहाविरुद्ध अगदीं कडवेपणा ठेऊन यापुढें चालणार नाहीं ' ( पान १११ ). हें जें मत त्यांनीं दिलें आहे त्या बाबतींत आम्ही आपल्या ग्रंथांत दिलेला एक सिद्धांत पुन्हां वाचावा अशी त्यांना विनंति आहे.

All states ( which depend wholly or partly on mind and on which social premium is put ) are states which tend to become common

Widow-remarriage is such a state

∴ Widow-remarriage will tend to become common.

घटस्फोट आणि विविधपुत्र यांसंबंधीं चर्चा नको. आम्ही पहिल्याबद्दल आमच्या ग्रंथांत आणि दुसऱ्याबद्दल पुरुषार्थ मासिकांत चर्चा केलीच आहे.

व्यवसायासंबंधीं प्रो. काणे म्हणतात, ' धर्म आणि वृत्ति यामध्यें भेद आहे. कित्येक ठिकाणीं हे दोन्ही शब्द एकाच अर्थानें वापरलेले आढळतात. तथापि मूलतः तीं भिन्न आहेत ' ( पान १२९ ). त्या बाबतींत आमच्या ग्रंथांत पुढील वाक्य आहे. आम्ही जीवनवृत्ति व आचार यांतील

फरक सांगून त्या दोहोंपासून उत्पन्न होणारे आचाराचे चार पर्याय पूर्वीच केले आहेत' ( पान २५७ ). तरी प्रो. काणे यांचा आमच्यांशीं तीव्र मतभेद कायमच आहे. कितीहि सुधारणावादी असले तरी प्रो. काणे हे इडाचे पंडित आहेत आणि अशा पंडिताविरुद्ध लिहिण्याचा प्रसंग यावा हें आमचें दुर्दैव आहे.

**मतैक्य**

प्रो. साहेबांनीं केलेल्या आश्रमधर्माच्या ऊहापोहासंबंधीं कोणी सनातनी मतभेद दर्शवील असें मला वाटत नाहीं. त्यांनीं आश्रमधर्माचा उपसंहार म्हणून केलेली चर्चा आमच्यांतील, बाल, तरुण आणि वृद्ध वाचून त्याप्रमाणें वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करतील तर हिंदु समाज जगाला निश्चित आदर्श होईल. परंतु............

त्यांचें भक्ष्याभक्ष्यावरील प्रकरणही उत्तम आहे. परंतु भक्ष्याभक्ष्य ठरवितांना सामाजिक परिणामांचा विचार न करतां फक्त ग्रंथोक्त चर्चाच त्यांनीं केली आहे. ' शिक्षण, आर्थिक स्थिति इत्यादि गोष्टी समान असतां निर्मांस लोकापेक्षां मांसाहारी लोकांत गुन्ह्यांची प्रवृत्ति व कठोरता हे दोष जास्त असण्याचा संभव असतो ' (पा. १७६ ) प्रो. काणे असें भीत भीत कां लिहितात ? जबरी संभोग, मारामारी, खून ( crimes against person ) वगैरे गुन्हे मांसाहारानें निश्चित वाढतात. ( See—Criminal Sociology—Ferri ). त्यांचा उपसंहारही सनातनी म्हणविरांना विरोधी नाहीं. ' स्वतःच्या घरांत वाटेल तें ज्यानें त्यानें करावे ' (पा. १९० ). तें जो तो करीतच आहे. परंतु अन्नपानाला कांहीं शुचितेचे अधिकृत नियम असावे किंवा नाहीं या बाबतींत प्रो. काणे मुग्धच आहेत. वाटेल त्या आचारानें एकाच जातींत संस्कृति भेद होईल असें वाटते. इतर बाबतींत त्यांचीं मतें बरीचशी ग्राह्य आहेत. त्यांनीं सार्वजनिक प्रसंगीं पंक्तिभेद न ठेवण्याचा केलेला उपदेश आचरणांत येऊं लागल्यास सनातन्यांना तेथें जातां येणार नाहीं इतकेंच ! त्यांनीं वैद्यक आणि धर्मशास्त्र यांचा विरोध सांगितला आहे त्यांत धर्मशास्त्र बरोबर आहे. परंतु त्या मताची पूर्णचर्चा करण्याचें हें स्थळ नाहीं.

स्त्रिया त्यांचीं कर्तव्यें आणि हक्क म्हणून जें प्रकरण लिहिलें आहे त्यांत मागील पन्नास वर्षांतील शिक्षणविषयक प्रगतीचा आढावा देऊन समाधान व्यक्त केलें आहे. तेथें स्त्रीशिक्षणाचे वांशिक परिणाम काय होतात त्याची थोडीशी चर्चा केली असती तर बरें झालें असतें. म्हणजे हें समाधान 'यत्तदग्रे अमृतोपमम् परीणामे विषमिव' आहे कीं काय त्याचा थोडासा खुलासा झाला असता. स्त्रीची वाढ पुरुषाच्या वाढीइतक्या काळापर्यंत चालत नाहीं हें लक्षांत टेऊन दोघांनीं सारख्या वयापर्यंत शिक्षण घ्यावें किंवा काय तेंही सांगावयास पाहिजे होतें. आम्हीं स्त्रीशिक्षण विरोधी जे मुद्दे आमच्या ग्रंथांत दिले आहेत ते प्रो. साहेबांनीं पुन्हा नजरेखालीं घालावे अशी त्यांना विनंती आहे. स्त्रियांची माता, भार्या वगैरे दृष्टीनें त्यांनीं केलेली चर्चा मान्य होण्यासारखी आहे. सनातनी स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य देऊं नये असें म्हणतात असें कल्पून ('स्ववत्तां अपि दर्शयति' हें सूत्र सनातन्यांना माहीत आहे) त्यांनीं सनातन्यांना कांहीं विचार करावयास सांगितला आहे त्याचा विचार करूं. पतिमरणानंतर अन्नवस्त्राची मालकीण होणाऱ्या स्त्रीचीं दुःखें सनातनी जाणत नाहींत असें प्रोफेसरांचें म्हणणें. अन्नवस्त्राची मालकीण निपुत्रिक स्त्री होत असते अशी आमची कल्पना आहे (आम्ही वकील नाहीं चूकभूल द्यावी घ्यावी). आतां जुन्या पद्धतींत वांझ स्त्रियांचें प्रमाण किती असें तें पाहूं. विवाहाचें वय बारापासून जसजसें वाढत जातें तसतसा वांझपणा शेंकडा २ पासून शेंकडा ७ पर्यंत वाढत जातो. म्हणून आधीं विवाहाचें वय वाढवावें, वांझपणा वाढवावा आणि मग अन्नवस्त्रांत काय हाल होतात तें सनातन्यांना विचारावें अशी ही सुधारणा आहे. एकत्र कुटुंबपद्धतीचा नाश जो होतो आहे त्यासंबंधीं त्यांनीं दिलेलें मत आज ग्राह्यच मानावयास पाहिजे. पुरुष एकदम दोन स्त्रिया करतात त्याबद्दल त्यांनीं नापसंती दर्शविली आहे. जे करीत असतील त्यांनीं जरूर तिकडे लक्ष द्यावें.

पाप, पुण्य, स्वर्ग, नरक, प्रायश्चित्त इत्यादि विषयक त्यांच्या कल्पना सनातनीच आहेत. पतितपरावर्तन आणि अन्यधर्मीय जनांचा संग्रह या

**प्रसार**

दोनही हिंदुधर्मांच्या विकासाच्या क्रिया आहेत. परंतु सेमेटिक धर्मांत त्या क्रिया व्यक्तीमूलक आहेत, आर्यधर्मांत त्या क्रिया गटमूलक आहेत. ती पद्धति म्हणजे ब्राह्मणांनीं सर्व नवागतांचें उपाध्यायत्व पत्करावयाचें आणि त्यांना हळूंहळूं संग्रहीत करावयाचें. मुसलमानांच्या स्वाऱ्यांच्या काळीं ही क्रिया व्हावी तशी झाली नाहीं. हिंदुस्थानांत कांहीं ब्राह्मण मुसलमान झाले. परंतु आध्यात्मिक तत्त्व कोणतेंही असलें तरी मनुष्याचें संस्कृत्यंतर होत नाहीं ही गोष्ट विसरून ते सर्वसाधारण समाजांत लीन झाले. परंतु त्या समाजांत आचार्यत्व पत्करून धार्मिक ग्रंथ संस्कृतमध्यें लिहिण्याची प्रक्रिया त्यांच्या हातून झाली नाहीं. हिंदुसंस्कृतीची छाप मुसलमानावर पडली परंतु तितकी पूर्ण पडली नाहीं. आज भांडत बसण्यापेक्षां मुसलमानी धर्मावर शौचधर्मांची छाप पडण्याचें काम प्रोफेसरसाहेब करतील तर ज्यास्त कार्य होईल. यांत प्रो. काणे वगैरे ऐतिहासिकांच्या नजरेस एक गोष्ट आणूं इच्छितों. हिंदुस्थानांतील जे प्रांत हिंदुसंस्कृतींत येण्यास नाखूष होते ते म्हणजे मुख्यतः बंगाल, पंजाब, सिंध वगैरे. याच प्रांतांत ( म्हणजे पहिल्याच्या आसपास ) गौतम महावीरांचीं पाखंडें उत्पन्न झालीं. याच प्रांतांत बुद्धधर्मांचा जोर झाला. तेथेंच आज मुसलमानधर्म प्रबल आहे. त्याचीं कारणें ऐतिहासिक आणि वांशिक आहेत. बंगाल आणि पंजाब सोडून दिल्यास मुसलमान लोक मुख्यतः शहरांत राहतात आणि शहरें हीं संस्कृतीवर फारसा परिणाम करूं शकत नाहींत. आम्ही स्वतः सनातनी असलों तरी हिंदुधर्मांचा प्रचार जपानपासून स्पेनपर्यंत झाला तरी आम्हांला पाहिजे आहे. परंतु तो हिंदुधर्मांच्या प्रकृतीशीं विरोधी पद्धतीनें होऊं नये इतकेंच आम्हाला म्हणावयाचें आहे. आमची प्रतिज्ञा

> ' एतद्देशप्रसूतस्य सकाशादग्रजन्मनः ।
> स्वं स्वं चरित्रं शिक्षेरन् पृथिव्यां सर्वमानवाः ।

अशी आहे, ते आम्ही धर्मप्रसाराला विरोधी कसें असूं? सनातनी कधीं कधीं विरोध करतांना दिसतात तो प्रसाराला नव्हे तर त्यांच्या पद्धतीला होय.

षड्दर्शनांचा धर्मशास्त्रांशीं जो त्यांनीं संबंध दाखविला आहे, त्याचा विचार करूं. तीं षड्दर्शनें म्हणजे दोन मीमांसा, न्याय–वैशेषिक, सांख्य–योग अशीं होत. त्यांपैकीं उत्तरमीमांसेचे सिद्धांत गृहीत धरून धर्मशास्त्रांत वर्ण, आश्रम वगैरे व्यवस्था केली आहे. पण आत्मज्ञानी हा सर्वांत श्रेष्ठ, हें सर्व सरळच आहे. सांख्ययोग या जोडीनें धर्माचें श्रेष्ठ ध्येय सांगितलें. ‘ अयं हि परमो धर्मः यद्योगे नात्मदर्शनं ’ तेंही युक्तच आहे. परंतु या दोन्हींवरूनही तात्कालिक आचारांना मार्गदर्शक असें कांहींच मिळत नाहीं. वेदांतावरून वर्णाश्रम धर्मनिष्पत्ति झाली असें प्रो. काणे सांगतात, परंतु त्याची जरूरीच काय असें आधुनिक तर्कवादी विचारीत आहेत. त्यांचें प्रोफेसरांनीं तर्कानें समाधान करावें. त्या गोष्टी सनातन्यांना सांगण्याचें कारण नाहीं. आतां पूर्वमीमांसेकडे वळूं. पूर्वमीमांसेनें वाक्यार्थ लावण्याकरितां ठरविलेले नियम उत्तम आहेत. ते आज देखील मॅक्सवेलशीं जुळतात असें त्यांनीं म्हटलें आहे. आम्हीही आपल्या ग्रंथांत तेंच सांगितलें आहे. परंतु ती सर्वच परिभाषा स्मृतींना लावणाऱ्या ग्रंथकारांनीं अतिरेक केला आणि विकृत अशी समन्वय पद्धति उपस्थित केली व त्यामुळेंच फार घोंटाळा माजला असें ते म्हणतात. त्यांचें म्हणणें, येथें ऐतिहासिक पद्धति लावली पाहिजे असें तत्त्ववाद्यांचें म्हणणें, रूढीवाद्यांना पटत नाहीं. यावर त्यांनीं बरीच आग पाखडली आहे. ते म्हणतात, ‘ एकादें वचन एकानें विधी म्हणावें, दुसऱ्यानें अर्थवाद म्हणावें, एकानें एक स्मृति प्रमाण मानून दुसऱ्या अप्रमाण मानाव्या, दुसऱ्यानें दुसरी प्रमाण मानून इतर अप्रमाण मानाव्या, शब्दांचे अर्थ मन मानेल तसे करावेत असे अनेक प्रकार आढळतात. आपल्या धर्मशास्त्रवाङ्मयाचा इतिहास पंचवीसशें वर्षांवर पसरला आहे व स्मृति लिहिण्याचें काम पंचराशें वर्षें चाललें होतें. इतक्या दीर्घकाळांतील भिन्न भिन्न प्रसंगीं झालेल्या वचनांचा समन्वय कसा करावयाचा ?’ (पा.२४९।२५०). समन्वय शब्दाचा अर्थ आपटे यांच्या कोशांत Connected Sequence, Mutual Connection दोन घटनांमधील सूत्र असा दिलेला आहे. परंतु दोन घटनांमधील सूत्र सांगावयाचें तर

दोन्हीं घटनांची माहिती पाहिजे आणि नसल्यास तशी कांहींतरी मानली पाहिजे. पूर्वी वांझ गाई मारीत आणि आज मुळींच गाय मारीत नाहींत. या दोन घटना झाल्या. यांना जोडणारें सूत्र म्हणजे इतिहास. हा इतिहास माहीत नसला म्हणजे काल्पनिक ( fiction ) जोडावा लागतो. तरच त्यांच्यामध्यें एकरूपता येते. नाहींतर दोन असंबद्ध अशा वेगवेगळ्या घटना ठरतील. परंतु वेगवेगळ्या घटनांची संतति म्हणजे कांहीं इतिहास नव्हे. वर दिलेल्या दोन घटनांतील दुवा तर प्रोफेसर कांहींच सांगत नाहींत आणि दुसऱ्याला 'Fools rush in where angels fear to tread' असें शिफारसपत्र देतात. त्यांनीं जी परिवर्तनाचीं उदाहरणें दिलीं आहेत तेथें ऐतिहासिक भूमिका देऊन या परिवर्तनानें अमुक हित झालें असें दाखवावयास पाहिजें होतें. त्यांच्या वर घेतलेल्या उताऱ्यावरून दिसून येईल कीं, त्यांना स्मृतिग्रंथांत फक्त कालभेद दिसतो. आम्हीं मागें दाखविलेंच आहे कीं स्थलभेद, लोकभेद, परंपराभेद हेही पण पहावयास पाहिजेत. ही गोष्ट त्यांनाही माहीती आहे. नागेशभट्टांच्या विरुद्ध मत मांडतांना प्रो. म्हणतात, 'नन्दान्तं क्षत्रियकुलं अशी म्हण पडली, नन्द हा मगधाचा राजा असल्यामुळें हा क्षत्रियनाश मगधापुरता समजावा' त्याप्रमाणेंच नियम स्मृतींना लावावयास नको कां ? एका भागांत झालेली स्मृति दुसऱ्या भागांत अप्रमाण होईल, म्हणजे एकच स्मृति प्रमाण आणि अप्रमाण होऊं शकते. हा फक्त मूर्खपणाचाच प्रकर्ष असें रा. काणे कां मानतात ? परंपराभेद मानावयास पाहिजे ही गोष्ट कात्यायनाला माहिती होती असें प्रोफेसर साहेबच सांगतात. म्हणून देश, काल, लोक, परंपरा या सर्व दृष्टींनी पृथक्करण करून ऐतिहासिक हिताहितत्व ठरवून समाजशास्त्रीय नियम काढण्यास प्रो. साहेब तयार असल्यास सनातनीहि त्या गोष्टीला तयार आहेत एवढेंच येथें अश्वासन देतों. त्यांचें अस्पृश्यतेवरील प्रकरण आम्ही मुद्दाम गाळलें आहे कारण त्याची ऐतिहासिक चर्चा आम्ही आपल्या ग्रंथांत पूर्णत्वानें केली आहे.

आतां त्यांच्या आमच्या ग्रंथावरील आक्षेपांकडे वळतों. प्रो. काणे म्हणतात 'या विद्वान ग्रंथकारांशीं, विशेषतः त्यांच्या कांहीं सिद्धांत काढण्याच्या पद्धतींशीं व सिद्धांतांशीं माझा तीव्र मतभेद आहे' (पान २७८).

मी मागें त्यांचे आणि माझे सिद्धांत सारखे आहेत असें दाखविलेंच आहे. त्या मतैक्यांची जंत्री देतों.

| आम्ही | प्रो. काणे |
|---|---|
| ( १ ) शब्दांचा आणि वाक्यांचा बरोबर अर्थ लावण्याकरितां मीमांसकांनीं जीं कांहीं तत्त्वें आणि गृहीत कृत्यें प्रवर्तित केलीं, त्यांना आजतागायत देखील कायद्याचा अर्थ लावण्याच्या दृष्टीनें फार किंमत आहे (पान ३८६–३८७). | अशा तऱ्हेचे सर्वसामान्य नियम मीमांसकांनीं प्रवृत्त केले ते वाक्यतात्पर्यनिर्णयासाठीं धर्मशास्त्रांत व हल्लींहि मानण्यास मुळींच हरकत नाहीं. ते Maxwell's Interpretation of Statutesशीं जुळते आहेत (पान २४०।२४१). |
| ( २ ) प्रत्येक व्यक्तीनें आपल्या हिंमतीप्रमाणें जी कांहीं परमेश्वरविषयक कल्पना असेल, त्या कल्पनेला धरून परमेश्वराची उपासना करावी अशी प्रत्येक हिंदूला मुभा आहे (पान ३०२). | कोणत्याहि रूपानें किंवा नामानें परमेश्वराची भक्ती केली, तरी ती एकाच परमेश्वराला पोंचते, असा सिद्धांत भगवद्गीतेनें वारंवार मांडला आहे. परमेश्वराची पूजा करण्याचे मार्ग भिन्न आहेत. एकाच मोठ्या मनुष्यानें सांगितलेल्या मार्गानें परमेश्वराची पूजा केली तरच पारमार्थिक कल्याण होतें असें नाहीं (पान ३०३।३०४). |
| ( ३ ) पुत्रैषणा, दारैषणा, वित्तैषणा या तिहींच्या तडाक्यांतून सुटलेला प्राणी विरळा आणि आधुनिक युरोपच्या संस्कृतींत नाहींच नाहीं. | असें जरी आहे व जरी त्यांच्यांतहि त्यागी, तृष्णाविरहित अशीं अनेक माणसें होऊन गेलीं तरी सर्वसाधारण माणसाचें ध्येय तें नव्हतें व अलीकडच्या **तीनशें वर्षें नाहींच.** तिकडे सर्वसाधारण माणसांचें ध्येय भौतिक सोयी व सुखें मिळविणें व त्यासाठीं सततोद्योग करणें हेंच असतें (पान ३०६). |

| आम्ही | प्रो. काणे |
|---|---|
| (४) म्हणून स्वर्गनरकादि कल्पना समाजांत रहाणें इष्ट आहे. स्वर्गनरकादि कल्पना, मोक्षाच्या कल्पना ज्याला आहेत, त्याला आत्म्याच्या अतिभौतिक सुखाची म्हणजे मोक्षाची किंमत ऐहिकापेक्षां फार जास्त वाटते. (पान २८३). | संहिताकाळीं आर्यांचें ध्येय स्वर्ग प्राप्त करून घेणें होतें. मोक्ष, कैवल्य, निःश्रेयस् हें श्रेष्ठ प्रतीचें ध्येय ठरविल्यावर तें मिळविण्याच्या साधनांची चिकित्सा होऊन...इत्यादि (पान ३०५). |
| (५) प्राचीनांच्या शिक्षणविषयक व संस्कारविषयक कल्पना अशा नव्हत्या. त्यांना नुसतीं नैतिक मूल्यें सांगावयाचीं नसून तीं मूल्यें प्रत्यक्ष आचारानें हाडींमासीं खिळवून टाकावयाचीं होतीं (पान ४३५). | मनुष्याच्या परम कल्याणाच्या दृष्टीनें त्याच्या आयुष्याला वळण लावलें पाहिजे, मोक्ष हा कल्याणप्रद असें ठरलें व त्याच्या प्राप्तीसाठीं शमदमादि साधनसंपत्ति आवश्यक असें ठरलें (पान ३०६). |
| (६) समाजशास्त्रदृष्ट्या शिक्षणाचें इतकें उत्तम वय आणि इतकी उत्तम पद्धति आज जे गाडीभर ग्रंथ त्या शास्त्रावर प्रसिद्ध होत आहेत त्यामध्यें कोठें केलेली आमच्या आढळांत नाहीं (पान ३४२). | आमच्या शिक्षणविषयक कल्पना आज विसाव्या शतकांतहि शिक्षणशास्त्रज्ञांना माना डोलवावयास लावतील अशा होत्या (पान ३०७). |
| (७) कर्मत्याग या शब्दामध्यें जातीय आचार आणि जातीय धंदे या दोन गोष्टींचा विचार करावा लागतो (पान २३८). | धर्म आणि वृत्ति यामध्यें भेद आहे. कित्येक ठिकाणीं हे शब्द एकाच अर्थानें योजलेले आढळतात. तथापि मूलतः तीं भिन्न आहेत (पान १२९). |

| आम्ही | प्रो. काणे |
| --- | --- |
| (८) प्रो. काणे 'ग्रीक, रोमन लोक विनाश पावले, आमचा समाज मात्र जिवंत आहे अशी प्रौढी रा. जोशी यांनीं मारली आहे. पण हा त्यांचा निव्वळ भ्रम आहे, (पान २८५). | तात्पर्य स्मृतिग्रंथ धर्मशास्त्र या अर्थानें आज २५०० वर्षें चालूं आहेत. प्राचीन संस्कृति इतक्या अविच्छिन्नपणें टिकून राहिलेली हिंदुस्थान व चीन या दोन देशांतच आढळते. |
| (९) या धर्मावर महावीर, गौतमादिक पाखंड्यांचे मातबर हल्ले झाले. परंतु या धर्मानें त्या सर्वांना तोंड देऊन त्यांचेंच या भूमींतून उच्चाटन केलें (पान २७). | पण या बुद्ध मताला हिंदुसमाजानें पचवून टाकलें (तसेंच जैन मताचेंही झालें). अर्थात् या कलमाला धरून आमची टर करणारीं जीं वाक्यें त्यांनीं लिहिलीं आहेत तीं सर्व निःपक्षपातीपणाचा परीणाम आहे. |
| यावर टीका करतांना प्रो. काणे यांनीं पळावयास लाविलें असा आपल्या पदरचा अर्थ घेतला आहे. | |
| (१०) मग जो राजसत्ता मिळवितो तो राजा. ते राजे इतर राजांशीं विवाहसंबंध करीत. हा संकर व युद्धाचे नैसर्गिक परीणाम, या कारणांनीं क्षत्रिय वर्ण किंवा जाति कधींच उत्पन्न झाली नाहीं. | उत्तरेकडे ब्राह्मण राजघराणीं कित्येक होऊन गेलीं असें इतिहासावरून दिसतें. आजंठ्याच्या लेण्यांत ज्यांचा उल्लेख आहे तें वाकाटक घराणेंहि ब्राह्मण होतें (पान ३१).<br>त्याप्रमाणेंच कदंन घराणें ब्राह्मण होतें. त्याप्रमाणेंच कांहीं प्रसिद्ध घराणीं वैश्य होतीं. राजांनीं वाटेल त्या जातीच्या कन्या केल्याची त्यांनींच |

(११) म्हणून विवाहपद्धतीसंबंधीं बोलतांना धार्मिक भावनांतील पवित्रपणा आणला पाहिजे हें पौर्वात्यांचें मत बरोबर नाहीं असें कोण म्हणेल ! (पान ३२९).

उदाहरणें दिलीं आहेत. विवाहविधीची कल्पना आपणाकडे फार उदात्त आहे व ती विवाहसंस्कार म्हणावयाच्या मंत्रांत चांगली दिसून येते. (पान ८२).

असो. अशा तऱ्हेनें प्रो० काणे यांनीं धर्मशास्त्र वाचून जे वेगवेगळे सिद्धांत काढले आहेत, त्यांपैकीं बऱ्याच सिद्धांतासंबंधानें असें दिसून येईल कीं, त्यांचे सिद्धांत आणि आमचे सिद्धांत यांत मुळींच भेद नाहीं. आमचे कांहीं समाजशास्त्रीय सिद्धांत त्यांनीं हेटाळणी करण्याच्या दृष्टीनें ग्रंथांत अवतीर्ण केले आहेत, परंतु समाजशास्त्राचें स्वरूपतः अभ्यास करणारांचीं उत्तरें आमच्या उत्तरासारखीं येतात; त्यांच्या उत्तरासारखीं येत नाहींत असें आतां दाखवूं. 'रा. जोशी म्हणतात पराभूत संस्कृति ही जेत्या संस्कृतीपेक्षां नेहमींच हलकी असते काय ? व पुढें ते म्हणतात विजय हा वंशाच्या श्रेष्ठत्वाचा पुरावा होऊं शकत नाहीं. विजयश्री ज्यांच्याजवळ श्रेष्ठ संहारक हत्यारें असतील त्यांनाच माळ घालील. परंतु श्रेष्ठ हत्यारें असणें हें कांहीं वंशाच्या श्रेष्ठत्वाचें लक्षण नव्हे. श्रेष्ठ हत्यारें मिळण्यांत बुद्धी इतकेंच नशीबाचेंही कार्य असतें. पराभूत संस्कृति नेहमींच जेत्यांपेक्षां हलकी नसेल, कांहीं बाबतींत श्रेष्ठही असेल, त्याचप्रमाणें विजयाचा वंशश्रेष्ठत्वांशीं दृढसंबंध नसेल असेंही मानूं. परंतु इतर बाबतींत वंशानें व संस्कृतीनें श्रेष्ठ असलेल्या समाजानें आपल्यांतील वैगुण्य अनेक वेळां तडाखे खावूनही कां दूर करू नये ?' (पा. २८६). हा लांबलचक उतारा प्रो० साहेबांची वादपद्धति कशी आहे तें दाखविण्याकरितां उतरून घेतला आहे. अर्थात् आम्ही आपल्या ग्रंथांत या मुद्याचा पूर्ण विचार केला आहे. आम्ही प्राणिशास्त्रीय प्रगति आणि सांस्कारिक प्रगति यांना धरून प्रगतीचे चार पर्याय करून त्यांतील तीन टाकाऊ आहेत असें दाखविलें आहे.

| प्राणिशास्त्रीय | सांस्कारिक | लोक |
|---|---|---|
| (१) हीन | हीन | आफ्रिकेंतील जाति |
| (२) वंश कोणतेही | उत्तम | इतिहासांत गाजलेल्या सर्व संस्कृति. |

| | | |
|---|---|---|
| ( ३ ) सुदृढ | हीन | गोथ, हूण, वेंडाल, तार्तार वगैरे |
| ( ४ ) दोन्ही समांतर | | हिंदु संस्कृति. |

चवथ्या संस्कृतीबद्दल आम्ही असें म्हटलें आहे कीं, ' या रचनेमध्यें पिंडप्रगति आणि सांस्कारिक प्रगति यांमध्यें तोल राखून धरावयाचा असतो, परंतु ही गोष्ट अत्यंत कठीण आहे ' ( पा. १५६ ). प्रो० साहेबांचें मतानें संस्कृतीची घटना म्हणून नसतेच, जसा वारा वाहील तशी पाठ फिरवावी. मध्यआशियांतून पिंडदृष्ट्या सुदृढ लोकांचे तांडे आले म्हणजे त्या तात्कालिक हल्ल्याकरितां आपण पिंडदृष्ट्या सुदृढ बनूं लागावें आणि युरोपियन राज्यकर्ते येथें आले म्हणजे लोकशाही स्वराज्य मिळविण्याची खटपट करावी. अशा तऱ्हेनें तत्त्व नसलेली संस्कृति कांहीं २५०० वर्षें अव्याहत परंपरा टिकवूं शकत नाहीं इतकेंच. या बाबतींत डॉ० केतकर लिहितात, ' जें मारलें जातें तें नाशार्हच असतें असें नाहीं. उच्च ध्येयें बाळगणारा समाज प्रसंगीं त्याच्या लष्करी दौर्बल्यामुळें चिरडून जाईल, तथापि तो चिरडला गेला एवढ्यावरून त्याच्या ध्येयांचें, विद्येचें आणि संस्कृतीचें महत्त्व नष्ट होत नाहीं ' प्राचीन महाराष्ट्र ( पा. २९९ ). संस्कृतीचे प्रकार, त्यांचे संघर्ष यांचा साग्र ऐतिहासिक चित्रपट पुढें मांडला असून प्रो० काण्यांनीं तिकडे दुर्लक्ष करून हे प्रश्न उत्पन्न करावे हें दुर्दैवच नाहीं तर काय ? प्रो० म्हणतात कीं, ' दैवानें एकादें वेळीं खो दिला असेल, पण दोन हजार वर्षें दैव आमच्या सारखें पाठीस लागलें आहे काय ? ' ( पा. २८६ ). येथें दोन हजार वर्षें हिंदुसमाजावर आपत्ति येत आहेत असें प्रो० दर्शवितात. तर ' राजसत्ता उघड उघड विरुद्ध असून देखील आज हजारों वर्षें हा धर्म आपलें व्यक्तित्व राखून राहिला आहे ' ( पा. २७ ). असें वाक्य आम्ही लिहिल्याबरोबर तेच साहेब आमचा इतिहास खोटा ठरविण्याकरितां इतिहासाची गैरलागू पानें उतरतात. ते हा मुद्दा अशा तऱ्हेनें स्पष्ट करून पुढें सांगतात, ' दैवमविद्वांसः प्रमाणयन्ति ' आम्हीही पण त्यांना सांगतों कीं, ' विद्वांसः अपि अविकत्थना भवंति. '

येथून त्यांनीं आमच्याबद्दल लिहिलेल्या एकूण एक ओळींचें परीक्षण करावयाचें. पान २७८ वर त्यांनीं माझें औद्धत्य प्रकट करणाऱ्या वाक्यांची यादी दिली आहे ती सर्व साधारण मनुष्याचें मन वळविण्याकरितां योग्य असली तरी न्यायदृष्ट्या गैरलागू ( Ignoratio Eleuchii ) असल्याकारणानें त्यांना उत्तर देत नाहीं. तिकडचीं

**अस्थिर शास्त्रें**

शास्त्रें वाढत आहेत. त्या शास्त्रांतील सिद्धांत तिकडेही अजून निर्विवाद मानलेले नाहींत. असे सिद्धांत आधाराला घेऊन आमची प्राचीन पद्धति निर्दोष होती असें दाखविणें म्हणजे कुशकाशावलंबन होय असें मला वाटतें ' ( पा. २७९ ). हाच आक्षेप अलीकडे फार पुढें येऊं लागला आहे म्हणून त्याचा पूर्ण चिकित्सक दृष्टीनें विचार करणार आहों. परंतु तत्पूर्वी प्रो. काण्यांना एक प्रश्न विचारावासा वाटतो तो असा कीं, आपल्याला जें लोकशाही स्वराज्य पाहिजे आहे तें आपल्या परंपरेंतील किंवा युरोपीय परंपरेंतील ? युरोपीय परंपरेंतील असल्यास तिकडे तें निरपवाद मानलें गेलें आहे काय ? नसल्यास आपणही कुशकाशावलंबन करीत आहांत. असो. शास्त्रें वाढत आहेत म्हणजे काय होत आहे त्याचा थोडासा खुलासा करावयास पाहिजे होता. जातिसंस्था ही अनुवंश अगर सुप्रजा ( Eugenic आणि सुव्यवस्था ( Euthenic ) या दोहोंच्या समुच्चयांत सिद्ध होते. त्यापैकीं शास्त्रें वाढत आहेत याचा अनुवंश मुळींच नाहीं असा अर्थ पाश्चात्य शास्त्रें पाहून मुळींच होत नाहीं. अनुवंश प्रक्रियेबद्दल मतभेद असतील परंतु अनुवंश गुणाबद्दल मुळींच मतभेद नाहींत. अनुवंश आणि परिस्थिति यांच्या तुलनेनें अनुवंश प्रबल असल्याचें रोजरोज जास्त निश्चित होत आहे. अगदीं परवांच जुळ्यांचा अभ्यास करून एका शास्त्रज्ञानें परिणामाच्या कोष्टकाचें प्रमाण दिलें आहे.

| | अनुवंश | परिस्थिति |
|---|---|---|
| वजन | १६९ | ८५ |
| छातीचा घेर | १६५ | ७० |
| उंची | १९२ | १८·५ |

Profo Von Verschene in Jour-

nal of American Medical Association

वैज्ञानिक ज्ञानाच्या सिद्धांतानें अनुवंश नियम जास्त स्थिर होत चालले आहेत. सनातन संस्कृति कशी करावी हा प्रश्न जरी सुटत नसला तरी त्यांना सांगण्यासारखा एकच मार्ग दिसतो तो म्हणजे कडक जातिसंस्था हाच होय ( पहा Genetical Theory of Natural Selection by R. A. Fisher पा. २५७ ). शास्त्रें अनिश्चित आहेत हें दाखविणारीं जीं दोन उदाहरणें त्यांनीं दिलीं आहेत त्यांपैकीं कणवादाच्या बाबतींत त्यांना कांहींच माहिती नाहीं हें मागेंच दाखविलें आहे. प्राणिशास्त्राचा आधार मी समाजरचनेला घेत आहे धर्मशास्त्राला नव्हे. रा. जोशी यांनीं पाश्चात्यांचें अनुवंशाचें तत्त्व सारसर्वस्व मानल्यामुळें त्यांचे विचार एककल्ली झाले आहेत' (पा. २९७). 'त्यांच्या सुमारें आठपट पाश्चात्यांचे (विशेषतः Biology, Sexology, Psychology, Politics, Economics ) आहेत' ( पा. २०० ) मी जर अनुवंश सारसर्वस्व मानला असतां तर हे बाकीचे ग्रंथ चिवडण्याचें मला कांहीं कारण नव्हतें. मी अनुवंश पाया मानतों, तसाच मनूही मानीत होता, तसाच त्यांनीं मानावा अशीच त्यांना माझी विनंती आहे. मतभेदाचें स्वरूप सांगतांना प्रो. काणे म्हणतात 'आमच्या समाजाची आहे हीच स्थिति उत्तम आहे, त्यांत सुधारणा करा असें म्हणणें म्हणजेच मुळीं मूर्खपणा आहे असें जर रा. जोशी यांचें म्हणणें असेल तर मग त्यांच्याशीं वाद करण्यांत अर्थ नाहीं ' रा. जोशी यांचें म्हणणें असें मुळींच नाहीं, म्हणून प्रो. साहेबांनीं त्यांच्याशीं वाद जरूर करावा. त्यांचें म्हणणें असें आहे कीं, आपण जी सुधारणा म्हणून म्हणतों, ती जास्त पारखून खरोखर हितकारक आहे असें दाखवून मग घ्यावी. परंतु प्रो. काणे यांनीं आपल्या ग्रंथांत तसें मुळींच सिद्ध केलें नाहीं. मुलीचें शिक्षण तर राहोच मुलांचें शिक्षण तरी आपल्या समाजाला हितकारक आहे असें दाखवितां येईल कां ! आपल्या हिंदुस्थानांत मानवाची अपेक्षित आयुर्मर्यादा ( Expectation of life ) विसाव्या वर्षी २९.६१ इतकी असते आणि तिसाव्या वर्षी २३.७ इतकी असते. ( Census of India, Acturial Report पा. १६५ ). म्हणजे

विसाव्या वर्षी शिक्षण संपल्यास मुलगा २९ वर्षें काम करूं शकेल आणि तिसाव्या वर्षी संपल्यास २३ वर्षें काम करूं शकेल. सर्वसाधारणतः २५ व्या वर्षी संपल्यास पंचवीस वर्षें काम करूं शकेल. युरोपमध्यें शिक्षण वाटेल त्या वयापर्यंत चालतें म्हणून तें इकडे कां ? शिक्षणाचा खर्च वाढून त्यापासून फलनिष्पत्ति मात्र कमी. ह्या शिक्षणांत पडलेला ब्राह्मण दोनचार पिढ्यांनीं सहीसलामत बाहेर पडेल कां ? कोणातरी लोकांनीं कांहींतरी गोष्ट म्हणजे सुधारणा असा गवगवा करावा आणि देशकालपरिस्थितीला धरून परिवर्तन करावें असें आज चाललें आहे. तें रा. जोशी यांना नको आहे. प्रो. काणे यांच्या वेळीं जें पदवी मिळविण्याचें साधारण वय होतें तें आज वाढत चाललें आहे. त्यांची माझ्या मताबद्दलची अटकळ मुळींच चुकली नाहीं. जोशी

> म्लेच्छा हि यवनास्तेषु सम्यक् शास्त्रमिदं स्थितम् ।
> ऋषिवत्तेऽपि पूज्यन्ते किंपुनर्दैवविद्द्विजः ॥

असें म्हणणाऱ्या संस्कृतीचे वारसदार आहेत. म्हणून प्रो. काणे यांना सांगतों कीं, ' परैः परिभवे प्राप्ते वयं पंचाधिकं शतं ' अशीच प्रो. काण्यांच्या बद्दल त्यांची भावना आहे. आमचे अपसिद्धांत आतां पहावयाचे. आमचे अपसिद्धांत दर्शविणारे त्यांनीं दोन उतारे दिले आहेत त्यांपैकीं एक ' हिंदु आणि चिनी लोकांनीं किंचित्कालपर्यंत प्रगति केली व ते तेथें थांबले, ते समाज पृथ्वीच्या पाठीवर जीवंत आहेत. ग्रीक व रोमन लोक सारखी प्रगति करीत गेले ते विनाश पावले ' (पा. ४२).

**आमचे अपसिद्धांत**

परंतु हा जर अपसिद्धांत असेल तर ' स्मृतिग्रंथ धर्मशास्त्र या अर्थानें पंचवीसशें वर्षें चालू आहेत असें म्हणावयास पाहिजे. प्राचीन संस्कृति इतक्या अविच्छिन्नपणें टिकून राहिलेली हिंदुस्थान व चीन या दोन देशांतच आढळते' (पा. २०). अशीं वाक्यें ते कां लिहितात ? म्हणजे जेहेते 'न जें प्रिय सदोष तें प्रिय सदोषही चांगलें । स्वतोक पितरां रुचे जरीहि कर्दमीं रांगलें ' आम्हीं इतकेंच म्हणतों कीं, Bravo तत्त्ववादी पक्ष. अशींच तत्त्वें शोधून काढण्याची टांकसाळ सुरू करा. लोकशाही स्वराज्य लवकर मिळेल. दुसरा त्यांना अपसिद्धांतांनीं भरलेला जो उतारा सांपडला तो म्हणजे आम्ही

ब्रॅह्मनिझमनें काय पराक्रम केले त्याचें पा. २७ वरील केलेलें वर्णन. तो उतारा म्हणजे त्यांच्या मतानें अनेक हेत्वाभासांचें एक कडबोळेंच. आमचें म्हणणें थोडक्यांत असें:—

( १ ) शंभर वर्षांत मध्य आशिया आणि आफ्रिका मुसलमान झाली.

( २ ) पांचशें वर्षे मुसलमानी सत्ता असून सर्व हिंदुस्थान मुसलमान झाला नाहीं.

( ३ ) खिस्ती धर्मापुढें युरोप वांकला, हिंदुधर्म वांकला नाहीं.

( ४ ) बुद्धधर्म चीन आणि जपानांत विजयी झाला, हिंदुस्थानांत टिकला नाहीं.

( ५ ) राजसत्ता विरुद्ध असून हा धर्म आपलें व्यक्तित्व कायम टिकवून आहे.

( ६ ) हा धर्म जगांतील सर्व धर्मांत वृद्ध आहे.

त्यांच्या मतानें हे सर्व अपसिद्धांत आहेत. ते कसे तें त्याचें म्हणणें पाहूं. 'आफ्रिका शंभर वर्षांत मुसलमान झाली हें इतिहासाला सोडून आहे. आफ्रिका म्हणजे त्या खंडाच्या उत्तरेची आणि थोडीशी पूर्वेकडील अरुंद पट्टी एवढाच भाग नव्हे' (पा. २८२।२८३). आफ्रिकेचा तेवढाच भाग त्यावेळीं सुधारलेल्या जगांत गणला जात असे. वादविवादांत मध्य आशिया त्यांनीं कां सोडून दिला? 'सर्व हिंदुस्थानावर मुसलमानी सत्ता कधींच नव्हती व पांचशें वर्षे तर नव्हतीच नव्हती' (पा. २८३). या बाबतींत त्यांनीं आमच्या ग्रंथांतील एक मुद्याचें वाक्य गाळलें आहे. 'परंतु हजार वर्षांच्या मुसलमानी हालचालीचें स्थळ जो पंजाब प्रांत, त्याच पंजाबांत अजून देखील बरीच प्रजा हिंदू आहे' (पा. २७). त्यांनीं या वाक्याच्या वरचीं आणि खालचीं वाक्यें उतरून घेतलीं आहेत. तत्त्वनिष्ठेमुळें फक्त हेंच वाक्य त्यांना सांपडलें नाहीं. हा इतिहास खरा असल्यास घरून निघाल्यापासून पंजाबांतच त्यांना प्रथम धार्मिक अडथळा झाला. ज्या भागांत हजार वर्षे सत्ता होती त्याच भागांत हें घडलें. तशीच सिंधमध्यें अकराशें वर्षे सत्ता होती तरी जेहेते तेथें अजून हिंदु आहेत. मग प्रो. साहेबांनीं जें ऐतिहासिक पांडित्य केलें आहे त्याचा उपयोग काय? येथें प्रचंड वस्तीच्या हिंदुस्थानचा संबंधच नाहीं. अगदीं थोडक्यांत

सांगावयाचें तर प्रो. साहेबांना संस्कृतीचा अभ्यास करण्याची संवयच नाहीं. सर्व ठिकाणीं त्यांची अशी कल्पना दिसते कीं, युद्धांत विजय मिळवील तरच ती श्रेष्ठ संस्कृति. ग्रीक स्वारीबद्दल त्यांनीं लिहिलेलें, याच जातीचें आहे. अहो साहेब ! ग्रीक सत्ता पुढें दोन तीन पिढ्या देखील टिकली नाहीं. 'बुद्धाला हिंदुधर्मानें पळावयास लावलें असें रा. जोशी पाहिजे तर म्हणोत. पण तें वाक्य अत्यंत हास्यास्पद आहे' (पा. २८४). तें हास्यास्पद असल्यास आम्ही प्रो. काणे यांचें 'पण या बौद्धमताला हिंदु धर्मानें पचवून टाकिलें' (पा. १). हें वाक्य घेतों. 'अशोकानें खरोखर ब्राह्मणी धर्माचा पाडाव करण्याचा फारसा प्रयत्न केला नाहीं' (पा. २८४). म्हणजे थोडासा केला. फार केला असें मत नुकतेच प्रो. बानर्जी यांनीं प्रिहिस्टॉरिक, एनशंट अँड हिंदु इंडिया या ग्रंथांत दिलें आहे. पोर्तुगीज खिस्त्यांबद्दल प्रो. काणे यांना कांहींही माहिती नाहीं. त्यांच्यामध्यें हिंदु वैशिष्ट्याची खूण ज्या जाती त्या शिल्लक आहेत. त्यांनीं पुढें दिलेला सर्व इतिहास अशाच तऱ्हेचा आहे. यज्ञयाग बुद्धानंतर बंद केले नाहींत एतद्विषयक पूर्वी लिहिलें आहे. अहिंसा ब्राह्मण धर्माचें एक अंग आहे असें त्यांनींच सांगितलें आहे. दान हें वैदिक धर्माचें अंग आहे असें तेच कथन करितात (पा. १६।१७). हिंदूच हिंदूंचे धर्म पाळूं लागले तरी तो बुद्धाचा जय होतो असें हें तर्कशास्त्र आहे. हिंदू धर्माची संग्राहक पद्धती आम्ही मागें सांगितलीच आहे. तेव्हां या वादांत वसिष्ठ वामदेवांची कांहींहि जरूरी नाहीं. दोघांना सारखीं मापें लावून सांगतों कीं, दैवतमूलक धर्म, जातिमूलकधर्म, कुलधर्म, परंपरामूलक धर्म हे हिंदुस्थानांत शिल्लक आहेत. ग्रीक, रोमनांचे नष्ट झाले. पुढें ते शास्त्र सोडून भावना आळवीत आहेत. 'रा. जोशी म्हणतात त्याप्रमाणें शेकडों वर्षें परसत्तेंत खितपत पडून रहाण्यापेक्षां' (पा. २८६). अरे ! अरे !! मागच्याच पानावर आपण शेंकडों वर्षें परसत्तेंत नाहीं असें आपणच सिद्ध केलें ना ? आपण महाराष्ट्री तर बरोबर ११७ वर्षेंच आहों. मग अगदीं इतकी जीवावर उदार होण्याची काय जरूरी ? संघटित या शब्दाची बरोबर निशाणी दाखवीपर्यंत इतरांना काय वाटतें त्यांतलें तथ्य शोधण्यांत कालापव्यय करण्याची इच्छाच होत नाहीं.

आमची बौद्धिक गुलामगिरी दाखविण्याकरितां त्यांनीं लिहिलेलें प्रकरण फारच खुमासदार आहे. त्यांतील माहितीचें वर्णन शूद्रकानें पुढीलप्रमाणें केलें आहे ' किं द्रौपदीव पलायसे राम-

**बौद्धिक गुलामगिरी**

भीता । एष हरामि सहसेति यथा हनूमान् । विश्वावसोर्भगिनीमिव तां सुभद्राम् ॥' शकारः कसें तें आतां दाखवितों. ' जोशीबोवांचा परात्पर गुरू जो नित्शे तो तर तीनच जाती वर्णन करतो ' ( पा. २८८ ). आतां आमचा परात्पर गुरू नित्शे हा शोध फार अजब आहे. आम्ही नित्शेचें तत्त्वज्ञान वाचलें आहे ( मूळांतून—केनेडीवरून नव्हे ). त्याचे आमच्यासारखे कांहीं विचार ग्रंथांत उद्धृतही केले आहेत, तरी तो आमचा गुरू कसा हें कांहीं कळत नाहीं. कारण त्याच्या तत्त्वज्ञानाचा आम्ही स्पष्ट निषेध त्याच ग्रंथांत केला आहे. ( पा.४७,१२० ). परंतु तत्त्वसंशोधनांत गुंतून गेल्यामुळें प्रोफेसरांचे तिकडे लक्षच गेलें नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, प्रो. काण्यांचा शास्त्रपद्धतीशीं मुळींच परिचय दिसत नाहीं. अनुवंशशास्त्र मानवासकट सर्व जीवजातीला लागू आहे. दुसरें असे कीं, एक नियम काढला कीं वैज्ञानिकशास्त्रांत तो त्या जातीच्या ( categories ) सर्व प्राण्यांना लागू असतो. त्याकरितां प्रत्येक जाति किंवा गट तपासावा लागत नाहीं. ज्याप्रमाणें मानसशास्त्राला प्रत्येक मनुष्याचें मन तपासावें लागत नाहीं अथवा इंद्रियविज्ञान शास्त्राला प्रत्येक मनुष्याचें विच्छेदन ( Dissection ) करावें लागत नाहीं, त्याप्रमाणें नियम काढल्यावर दहा हजार जाती पहाव्या लागत नाहींत. ते म्हणतात कीं, जोशीबोवांच्या तत्त्वांनीं आमच्या तीन हजार जातींचें समर्थन होत नाहीं. किती जाती असाव्यात हा आंकडा कोणत्या शास्त्रावरून काढावा तें मात्र जोशीबोवांना सांगतां येत नाहीं. ती माहिती प्रो. काणे यांनीं त्यांचे परात्पर गुरु वेबर, ग्रिफिथ, ग्रासमन, ओल्डनबर्ग वगैरेंच्याकडून मिळविल्यास ती ग्राह्य मानावयास जोशी तयार आहेत. चार हजार चांगल्या तर जोशीबुवांनीं चाळीस हजार सांगाव्यात असें प्रो. काणे सांगतात. जोशींचें म्हणणें जाति होतात, प्रो. साहेबांचें म्हणणें त्या करावयाच्या असतात. असले अतिदेश करून वादविवाद करण्यापासून काय फायदा होणार तेंच कळत नाहीं. आम्ही मानवजातीच्या दृष्टीनें भौगोलिक चर्चा

केली आहे. त्या बाबतींत त्यांनीं जें लिहिलें आहे तें मात्र विद्वत्तेचा नमुना म्हणून राखून ठेवण्यासारखें आहे. त्यांनीं इतकें लिहिण्याच्या ऐवजीं असें लिहावयास पाहिजे होतें कीं, अक्षांश म्हणजे एक रेघ असते तीवर एक-माणसाला देखील उभें रहातां येणार नाहीं. मानव वस्तीच्या दृष्टीनें अक्षांश म्हणजे सर्व पृथ्वीचे हवेच्या दृष्टीनें मोठमोठाले विभाग करतात. देशविभागाचे लोकवस्तीवर काय परिणाम होतात यासंबंधीं थोडीशी माहिती त्यांनीं पाट-शाळांतून हल्लीं जी भूगोलाची माहिती शिकवितात तेवढी माहिती करून घेतली तरी लक्षांत येईल. नंतर राजापुरी चित्पावन, अलीबागी चित्पावन, नागपुरी चित्पावन वगैरे त्यांनीं माजविलेला पसारा बरोबर नाहीं ही गोष्ट त्यांना विशद होईल. डार्विन आणि लोत्झी यांच्यामधील जो मतभेद त्यांनीं आमच्या ग्रंथावरून दाखविला आहे, तो अनुवंशाच्या तत्त्वासंबंधीं नाहीं, तर त्याच्या पद्धतीसंबंधीं किरकोळ मतभेद आहेत. 'पृथ्वीच्या पाठी-वरील अनेक वंशांचें आणि त्यांच्या गुणांचें शास्त्रीय परीक्षण अजून व्हाव-याचें आहे' (पा. २८८). होऊं द्या. पण तें होण्यापूर्वींच जातिभेद वाईट आहे असें कां ओरडत सुटतां ? अशा तऱ्हेचा लपंडाव करणें तत्त्ववादी म्हणविणारांना शोभत नाहीं. मिल्ल वगैरेंचीं तत्त्वज्ञानें घेणारांना जोशी हंसत नाहींत, ते इतकेंच म्हणतात कीं, 'आर्षं धर्मोपदेशं च वेदशास्त्रविरो-धिना । यस्तर्केणानुसंधत्ते स धर्मं वेद नेतरः ॥'

पुढें त्यांनीं आमच्या हास्यास्पद पद्धतीची चर्चा केली आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, 'नुसता धंदा बदलला यांत सृष्टीचा नियम काय मोडला ?' (पा. २८९). बरोबर आहे. जोशी यांचें म्हणणें, सर्व ग्रंथ-भर सृष्टीच्या नियमाबद्दल आहे आणि त्यांत समाजाचे नियमाबद्दल कांहींच नाहीं. जोशी यांचें म्हणणें असें आहे कीं, पंचवीस पंचवीस पिढ्या एक थरांत गेल्यानंतर जे कांहीं शारीरिक आणि मानसिक गुणांचें मिश्रण होतें, तें मोडावें काय? आम्ही दोनच उदाहरणें दिलीं म्हणून त्यांना राग आला. त्यांना जी इतिहासांतील ब्राह्मण, वैश्य, शूद्र, म्लेच्छ राजघराणीं माहीत आहेत त्यांच्या पिढ्या मोजून किती भरतात त्या पहाव्या. उलट ब्राह्मण गोत्रें वंशपरंपरेनें बापापासून मुलाला अशीं सरासरी तीन हजार वर्षें तरी आलेलीं आहेत. त्या लांबीशी या पिढ्यांची तुलना करावी. त्याबरोबरच

ब्राह्मणाइतकी अविच्छिन्न परंपरा जगांत दुसऱ्या कोणत्या घराण्यांत असल्यास त्याची आम्हाला माहिती द्यावी. आम्ही गणितानें अभ्यास करून रेखाचित्र देखील द्यावयास तयार आहोंत. सर्व शाखा उपशाखा विद्यमान असण्याचा अगर नसण्याचा प्रश्न नसून नामांकित पुरुषापासून चार पिढ्यांत खेळ खलास कां होतो हा प्रश्न आहे! त्यावर अभ्यास होऊन कांहीं निष्कर्षही निघाले आहेत त्यांच्या आधारें आम्ही वरील विधान केलें आहे. ( या लोकसंख्येच्या बाबतींत Hereditary genius–Galton 1869 p. 123-133, Histoire des sciences et des savants depuis deux Sie'cks–by A de Candolle p. 157-161, J. A. Cobb.-Human Fertility-Eugenic Review (1913) p. 379-382 इत्यादि वाचून पहावें. ) जगांत इतिहास कोठेंही पाहिला तरी त्यांना हेंच दिसून येईल. तरीहि त्यांना थर सोडण्यास सांगावयाचें असल्यास सांगावें. समाजसुधारणा लवकर होऊन लोकशाही स्वराज्य मिळेल.

**वडाची साल पिंपळाला**

पुढें त्यांनीं आम्ही वडाची पिंपळाला चिकटविलेली साल दाखविली आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, प्रकृति श्रेष्ठथात् या पदांतील प्रकृति शब्दाचा आम्ही जो नैसर्गिक गुणधर्म (Eugenic) असा अर्थ केला आहे तो चूक आहे. असेलही बापडा. प्रकृति शब्दाचा पहिला अर्थ The natural condition or state of anything आणि दुसरा अर्थ Natural disposition, constitution असे अर्थ वा. शि. आपटे यांच्या कोशांत दिलेले आहेत. झळकीकरांनीं संपादिलेल्या न्यायकोशांत ' यावदाश्रयभाविधर्मः । यथा प्रकृत्या कृपणः स्वभावेन सरलः।' असें प्रवचन सांपडतें. शिवाय प्रकृत्यादिभ्यः उपसंख्यानाम् असें वार्तिकही आहे. तेव्हां आमचा अर्थ कोशांतच नाहीं असें कांहीं प्रो. साहेबांना म्हणतां येणार नाहीं. त्यांनीं केलेला शाश्वत शब्दाचा 'बहुत काळ टिकणारा' हा अर्थ मात्र कोठल्याही कोशांत नाहीं. आतां आमचा अर्थ या विवक्षित श्लोकांत आहे किंवा नाहीं हें पहावयाचें.त्यांचें म्हणणें असें कीं,हा श्लोक पहिल्या अध्यायांतील दोन श्लोकाबरोबर

वाचला पाहिजे आणि तसाच तो सर्व टिकाकारांनीं वाचला आहे. त्यांनीं पुष्कळशा टीकाकारांचे उतारेही दिले आहेत. आम्ही शिंग मोडून वासरांत शिरतों असेंही म्हटलें आहे. धार्मिक चर्चेत शिंगें येऊन वप्रक्रीडा आम्ही कधीच केलेली नाहीं. पहिल्या अध्यायामध्यें मनु काल्पनिक व्यवस्था करतो आहे. दहाव्या अध्यायांत मनु प्रत्यक्ष व्यवस्था करतो आहे. पुढें त्याच अध्यायांत त्यानें अनुवंशानें होणारी जातिसंस्था सांगितली आहे. तेव्हां आनुवंशाचा ज्या अध्यायांत विचार झालेला आहे. तेथें अर्थ लावतांना काल्पनिक उपपत्ति घ्यावयाची किंवा काय हा प्रश्न आहे ? सर्व श्रुति जरी कोळून प्यालों तरी मुखापासून उत्पत्ति ही काल्पनिकच कां खरी ? 'ब्राह्मणोऽस्य मुखमासीत्' कस्य मुखमासीत् । यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् । या ऋचेंत कर्ता कोण ? येथें क्रियापदें बहुवचनीं आहेत. ब्राह्मण याचें मुख होता असा त्या ऋचेचा अर्थ आहे. दुसऱ्या ऋचेचा अर्थ 'ब्राह्मण हा प्रथम उत्पन्न झाला' असा त्यांनींच दिला आहे. या दोन्हीवरून उत्तमांगापासून उत्पत्ति झाल्याचा बोध कसा होतो? आमचा संस्कृत ग्रंथांशीं परिचय नाहीं, आम्ही अज्ञ आहोंत अशी प्रो. साहेबांची तक्रार आहे ती खरीहि असेल. तरीहि उत्तमांगापासून उत्पत्ति हा त्यांचा अर्थ श्रुतिवरून सिद्ध होतो कां ? प्रत्यक्ष व्यवस्थेमध्यें काल्पनिक उपपत्ति न घेतां प्रत्यक्षच घ्यावयास पाहिजे. म्हणून आम्हीं म्हणतों प्रकृति शब्दाचा नैसर्गिक गुण हाच अर्थ घ्यावयास पाहिजे. मनूच्या सात छापील आणि एकूणपन्नास हस्तलिखित टीकांत जरी प्रत्यक्ष व्यवस्थेंत काल्पनिक उपपत्ति घ्यावी असें लिहिलें असलें तरी आम्हाला स्वीकारतां येत नाहीं. त्याबरोबरच हा अर्थ डार्विन, मेंडेल, नीत्शे वगैरेंचा नसून आपटे, झळकीकर, कात्यायन वगैरे लोकांचा आहे. म्हणून पुन्हां सांगतों कीं, आम्ही सरळ अर्थ केला आहे. कोणत्याही तऱ्हेनें वडाची साल पिंपळाला लावलेली नाहीं. हातचलाखीहि केली नाहीं. आमच्या 'धर्मग्रंथांत जेथें धर्म शब्द येईल तेथें त्याचा अर्थ आचार असा नाहीं' या वाक्यांतील मुद्रणदोष त्यांचा ग्रंथ वाचल्यावर दिसून आला. तेथें 'आचार' याबद्दल 'आचारच' असें पाहिजे. शाश्वत म्हणजे बराच काळ टिकणारे असा अर्थही कोणत्याही कोशांत नाहीं हें मागें सांगितलेंच आहे. आम्ही अज्ञ आहोंत

परंतु आम्ही शब्दांचे अर्थ कोशांतून तरी घेतों, पदरचे चिकटवीत नाहीं. त्यामुळें त्यांचे धर्मशब्दावरील प्रवचन अस्थानीं असून त्या श्लोकांत धर्म शब्दाचा अर्थ नैसर्गिक गुण हाच आहे. मानवी समता, भयंकर सिद्धांत, लोकसंख्या वगैरे संबंधीं त्यांनीं जें लिहिलें आहे त्याबाबतींत लोकसंख्याच्या वेगवेगळ्या थरांत जी जननसंख्या ( fertility rates ) असते त्या बाबतींत त्यांनीं जरा लक्ष घालावें इतकीच त्यांना विनंती करतों. मनूचा हेतू कांहीं निष्फळ झाला नाहीं. परंतु तो आतां लोकशाही स्वराज्यांत होत चालला आहे ही गोष्ट १९३१ च्या खानेसुमारींतील जातींची वाढ आणि घट पाहिल्यास त्यांच्या नजरेस येईल. त्यांनीं जो भयंकर सिद्धांत म्हणून सांगितला आहे तो आज प्रत्येक समाजशास्त्री सांगूं लागला आहे. मनूलाहि तोच अभिप्रेत होता हें सहज दाखवितां येईल; परंतु ग्रंथविस्तार फार होईल.

आमचे कांहीं निवडक सिद्धांत त्यांनीं उतरून घेतले आहेत परंतु त्यांची चर्चा करण्यास त्यांना सवड नाहीं. ( १ ) म्हणूनच आम्हीं म्हणत असतों

**आमचे कांहीं सिद्धांत**

कीं, ब्राह्मणजातीनें आपलें संस्कृतिरक्षण करण्याचें कांर्य टाकून राजकारण, समाजसुधारणा वगैरे भानगडींत पडूं नये. या बाबतींत प्राचीन ब्राह्मणांबद्दल डॉ. केतकर म्हणतात, 'ब्राह्मणांनीं जी विद्या वाढविली ती राजाश्रयानें वाढविल्याचें मुळींच दिसत नाहीं. आश्रम म्हणजे उच्च प्रकारचा बौद्धिक क्रम आचरणारीं स्वतंत्र क्षेत्रें म्हणजे खेडीं होतीं. तेथें विद्येस प्राधान्य होतें आणि **इतर प्रकारच्या चढाओढींपासून जनता मुक्त होती**. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्राचीन ब्राह्मण आपली जीविका स्वावलंबनानेंच करून विद्यासंवर्धनाचें आणि विद्यारक्षणाचें कार्य करीत होते.' पुन्हा 'समाजाच्या दृष्टीनें सद्गुण म्हटला म्हणजे **ज्या गोष्टींची ताबडतोब गरज नाहीं**, तर मधून मधून केव्हां तरी लागणार, त्या गोष्टीचा पुरवठा करून ठेवणें' प्राचीन महाराष्ट्र पा. २९९. अगदीं अशीच रचना डॉ. मॅक्डुगल यानें आपल्या नॅशनल वेलफेअर ॲण्ड नॅशनल डीके या ग्रंथाच्या सुरवातीला दिली आहे. अगदीं तेंच मत राष्ट्रसंरक्षणाच्या दृष्टीनें डॉ. फ्रीमन् यानें सोशल डीके आणि रीजनरेशन् या ग्रंथांत दिलें आहे. सुप्रजायुक्त जाति बनविल्यास त्या जातीचा व्यवहार असाच असाव-

यास पाहिजे हें मेजर डार्विननें नीड फॉर युजेनिक रीफॉर्म या ग्रंथांत दिलें आहे तें आम्ही आपल्या ग्रंथांत नमूद केलें आहे. अशा तऱ्हेनें प्राचीन संस्कृतीचें रक्षण करण्याकरितां प्रत्यक्ष आचरणांत आणलेला, प्राणिशास्त्र संस्कृतीला पाया घडल्याबरोबर अर्वाचीनांनाही प्रतीत होऊं लागलेला सिद्धांत रा. जोशी यांनीं जर सांगितला तर रा. जोशी यांचा दोष कोणता ? सनातन अविच्छिन्न संस्कृति रहावी अशी इच्छा करणारा कोणीहि मनुष्य असेंच सांगेल. संस्कृतिरक्षण हें अत्यंत कष्टाचें काम आहे. त्याकरितां परंपरागत पिढ्यानुपिढ्या शिक्षण देऊन एकाद्या समाजांत जर एकादा वर्ग उत्पन्न केला तर तो समाज दूरदर्शी होता असेंच मानणें भाग आहे. त्यांनीं घेतलेले सिद्धांत दोन आणि तीन (पा.२९८) त्यांच्याही ग्रंथांत जसेच्या तसे आले आहेत ही गोष्ट पूर्वीं दाखविलीच आहे.

आर्य हा वंश होता किंवा संस्कृति होती ही गोष्ट आतां धर्मशास्त्रविचार-ग्रंथाच्या लेखकाशिवाय पुष्कळांना माहीत झालेली आहे. आर्यसंस्कृतीच्या छत्राखालीं विविध वंश नांदत होते, म्हणजे आर्य हा एक वंश नव्हता.

शेवटचा सिद्धांत म्हणजे आजच्या लोकांना खूष करण्याकरितां त्यांनीं टाकलेला हुकमाचा एक्काच म्हणावयाचा. 'राजकीय स्वातंत्र्य समाजरक्षणाला लागणारीं इतर साधनें नसल्यास कितपत हितावह होईल, याचाही पूर्ण विचार व्हावयास पाहिजे. राजकीय स्वातंत्र्य हेंच ध्येय असावें असें देशभक्त लोक देखील म्हणतील असें आम्हांला वाटत नाहीं. राजकीय स्वातंत्र्य हें दुसऱ्या कोणत्यातरी ध्येयाचें साधन असणार. पारतंत्र्यांतही तें ध्येय सिद्ध होत असेल तर ? परंतु हें ध्येय तरी कोणतें ? प्रगति ! छाननी करीत आपण गेलों म्हणजे धर्माचें रक्षण करणें हेंच ध्येय फक्त शिल्लक रहातें' ही तांबडी चिंधी अलीकडे कोठेंही पुढें करावी आणि सांगावें पहा या लेखकाला स्वातंत्र्याची देखील चाड नाहीं. पशुपक्ष्यांनाही जें कळतें तें यांना कळूं नये. पशु तरी कसा वागेल ?

क्षिप्तं पुरो न जगृहे मुहुरिक्षुकाण्डम्
नापेक्षते स्म निकटोपगतां करेणुम् ॥
सस्मार वारणपतिः परिमीलिताक्षम् ।
इच्छाविहार वनवासमहोत्सवानाम् ॥

प्रो. साहेब म्हणतात स्वातंत्र्य हें आमचें साध्य आहे साधन नव्हे. शिवाजी-महाराजांच्यापर्यंत पहात आलों तरी तें साधन—धर्माचें साधन—होतें असें दिसतें. ‘परित्यजेत् अर्थकामौ यौ स्यातां धर्मवर्जितौ’ हें मनुवचन आणि ‘अर्थशास्त्रात् तु बलवत् धर्मशास्त्रमिति स्थितिः’ हें याज्ञवल्क्यवचन त्यांच्या परिचयाचें आहे. शिवाजीमहाराजांच्या वेळीं होऊन गेलेला तत्त्ववेत्ता रामदास स्वराज्याबद्दल म्हणतो

बुडाला औरंग्यापापी। म्लेच्छसंहार जाहला।
उदंड जाहले पाणी। स्नानसंध्या करावया॥

हा तत्त्ववेत्ता मुंबईत हायकोर्ट वकील असता तर संध्येच्या वेळीं मलबार हिलवर फिरावयास गेला असता. परंतु स्वराज्य हें ध्येय मानल्यास इंग्लंड-मध्यें आतां सामाजिक प्रश्न मुळींच उरतां कामा नयेत. प्रो. काणे यांना फार दुःख होत आहे कीं, पुष्कळांना स्वराज्य हें ध्येय वाटत नाहीं. आम्ही प्रो. काणे यांना असें आश्वासन देतों कीं, आम्ही स्वराज्याकरितां ते सांगतील ती गोष्ट करण्यास तयार आहोंत. परंतु धर्मत्याग करून नव्हे, धर्माचा नंबर पहिला व स्वराज्याचा नंबर दुसरा. आम्ही अतुल कर्तृत्ववान् चित्पावन जातींत जन्म घेतलेला आहे. ज्या सह्याद्रीचा प्रत्येक फूट स्वातंत्र्यप्रिय मराठयांच्या रक्तांनीं भिजून गेला आहे, ज्या पुण्यांतील पराक्रमी सदाशिवानें मुसलमानांच्या तक्ताच्या दिल्लींत नाचून ठिकऱ्या उडविल्या, ज्यांचीं प्रतीकें रोज आमच्यासमोर आहेत, ज्या पुण्यानें लो. बाळ गंगाधर टिळक यांच्यासारखा पुढारी उत्पन्न केला; त्या सर्व घटनांशीं परिचित असलेले आमच्यासारखे स्वातंत्र्याची चाड बाळगीत नाहींत असे आमचे बांधव प्रो. काणे आणि इतर यांना वाटावें हें आमचें दुर्दैव आहे. आम्ही हें वाक्य लिहीत असतांना पूर्वीच्या पिढींतील दामोदरपंत चापेकरांचे औरस चिरंजीव आमच्याजवळ बसलेले आहेत. परंतु प्रो. साहेब ‘अभिवर्षति योऽनुपालयन् विधिबिजानि विवेकवारिणा’ हा उपदेश लक्षांत ठेवावयास पाहिजे असें आम्हाला वाटतें. असो. समाजाच्या प्रपंचांत दार्ढ्य आणावयाचें असल्यास तें राजकारणापेक्षां धर्मानें जास्त येतें ही गोष्ट आम्ही ग्रंथांत विशद केलीच आहे. तीच गोष्ट समाजाच्या इतर अभ्यासकांना कशी काय दिसते तें दाखवितों. ‘राज्यें नष्ट होतात, आणि साम्राज्येंही

नष्ट होतात. जुनी घटना नष्ट झाली तरी नवी घटना जेव्हां तयार होते, तेव्हां जुन्या घटनेमध्यें जे **सामाजिक नियम** कार्य करीत होते, तेच **सामाजिक नियम** नव्या घटनेंतही कार्य करीत असतांना दिसतात; त्यामुळें सामाजिक घटनेंत दिसणाऱ्या नियमांचें कार्य अत्यंत दीर्घ कालपर्यंत सांगतां येईल' प्राचीन महाराष्ट्र (पा. २९८). या लेखकाच्या मतानें सामाजिक घटनेचे नियम राज्यें आणि साम्राज्यें यांच्याहून जास्त प्रभावशाली असतात. अशाच तऱ्हेचीं मतें प्राचीन स्मृतिकारांनीं आणि आधुनिक समाजशास्त्रज्ञांनीं दिलीं आहेत. अशींच अभ्यासूंचीं अनंत मतें देतां येतील, परंतु त्यांपैकीं एकच प्रो. साहेबांना सादर करतों. डीन इंग म्हणतो 'Our own imperialists had their illusions too, and we are not rid of them yet because we do not realise that the fate of the races is decided not in the council chamber or on the battle-field, but by the same laws of nature which determine the distribution of the various animals and plants of the world' Outspoken Essays, First Series (पा. ८३.)

शेवटीं नित्शेसंबंधीं त्यांनीं लिहिलें आहे. त्याच्या आणि आमच्या कांहीं विचारांत साम्य असलें तरी आम्ही त्याचे अनुयायी नाहीं हें आम्ही मागेंच

**नित्शे**

सांगितलें आहे. त्याच्या कांहीं तत्त्वांशीं असलेला विरोध आम्ही आपल्या ग्रंथांत नमूद केला आहे. पुन्हां त्याचें तत्त्वज्ञान इतकें मोठें आहे कीं, तें अशा तऱ्हेच्या सर्व हल्ल्यांतून तावून सुलाखून निघालें आहे. त्याचें संरक्षण आमच्या दुर्बळ लेखणीनें दुसऱ्या एका दुर्बळ हल्ल्यापासून करण्याचें तादृश कारण नाहीं. परंतु त्यांनीं लिहिलें आहे आणि सनातन्यांना त्यांत कांहीं सूचनाही दिल्या आहेत म्हणून आपणही थोडीशी जागा खर्चीं घालूं. प्रो. साहेब म्हणतात ' हा सिद्धान्त पुनर्जन्म मानणारे जे आम्ही त्यांनीं मनन करण्यासारखा आहे ' (पा. ३००). आम्हीही पुनर्जन्म मानतो परंतु प्रो. साहेबांना आमची विनंती आहे कीं, उपनिषद् पूर्वकाळीं वेदसंहितारूपी श्रुतिमाऊलीनें या बाबतींत काय सांगितलें आहे ते अज्ञ जनाकरितां साध्या मराठी भाषेंत

समजावून सांगणें. संस्कृत भाषेशीं परिचय नसल्यामुळें आम्हालाही माहिती होईल. त्यांनीं आमचे कांहीं विचार नित्शेच्या विचारासारखे असल्याचें दाखविलें. आम्ही त्याहून पुष्कळ जास्त विचार प्रो. आणि आम्ही यांना समान आहेत असें दाखविलें आहे. परंतु ह्या सामान्यावरून अनुमान कोणतें काढावयाचें ? आम्ही नित्शेपेक्षां त्यांना स्वतःलाच जवळ आहोंत इतकेंच. मग आम्ही नित्शेचे पट्टशिष्य कां प्रोफेसर साहेबांचे पट्टशिष्य ? असो. नित्शेनें ख्रिश्चन धर्मावर मातब्बर हल्ला केल्यामुळें ख्रिस्ती राष्ट्रांत प्रथम फारच खळबळ उडाली, परंतु या वावटळीच्या वर जे तत्त्ववेत्ते असतात त्यांना नित्शेच्या तत्त्वांतील खरेपणा हळूहळू प्रतीत होऊं लागलेला आहे. तत्त्ववेत्ते जे तत्त्ववेत्त्यांचे अनेक प्रकार करतात त्यामध्यें नीतिप्रवर्तक तत्त्वज्ञानी असा एक विभाग करीत असतात. ( Philosophy of value ) आधुनिक काळांत जे या तऱ्हेचे तत्त्ववेत्ते होऊन गेले त्यामध्यें तत्त्ववेत्ते नित्शेची गणना करतात. मग जे. एम्. केनेडी कांहीं म्हणो. (See Modern Philosophers by Hoffding ) मीं नित्शे हा काय होता यावर येथें व्याख्यान देत नाहीं. परंतु जिज्ञासूंनीं वरील ग्रंथ पहावा कारण तो अगदीं थोडक्यांत सांगतों. हल्लींच्या अमेरिकन मताचा एक आधार स्तंभ हेन्री मेंकेन यानें त्याच्या तत्त्वज्ञानावर ग्रंथ लिहून तें तत्त्वज्ञान राष्ट्रांनीं शिकावें असें सांगितलें आहे. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत आज नित्शेला मानाचें स्थान मिळालेलें आहे तें मुंबईकरांच्या अडीच पानी हल्ल्यानें नष्ट होईल असें वाटत नाहीं. त्याची मनःपृथक्करणाची पद्धति तर आजचे फ्रायडचे चेले मान्य करीत आहेत. ( Papers on psychoanalysis by Ernest Jones ). समाजरचनाक्षेत्रांत नित्शेबद्दल डीन इंग म्हणतो, ' But the quarrel between Nietzsche and christianity goes deeper than this. It is possible to organise society on the basis of a ruling class exercising complete control over a submissive multitude. *Christianity can tolerate a social order of this kind*, but assuredly its tendency is to claim inalienable rights for every human being

as such.' Christian Ethics and Modern Problems. असो. निशे आपली काळजी घेण्याला समर्थ आहे.

**थोडक्यांत**

आतांपर्यंत असें दाखविलें कीं, प्रो. काणे ऐतिहासिक पद्धति म्हणून म्हणतात ती ऐतिहासिक पद्धति नव्हे. ते फक्त कांहीं वाङ्मयाचा उपयोग करतात. परंतु तो नुसत्या कालभेदानेंच. त्यांच्या मतानें पाणिनी आणि कात्यायन यांच्यामध्यें मतभेद झाला, त्यांनी वेगवेगळे अर्थ सांगितले कीं त्यांच्यामध्यें कालभेद असला पाहिजे. स्थलभेद असूं शकत नाहीं. आज माझ्या ग्रंथावर प्रो. काणे यांनीं टीका केली आहे, त्याअर्थीं ते माझ्यामागून शंभर वर्षांनीं मागून झाले असले पाहिजेत. ज्याप्रमाणें स्थलासंबंधीं त्याप्रमाणेंच लोकासंबंधीं. वैदिक लोक पसरत असतांना हिंदुस्थानांत दुसरे लोक होते. त्यांचाही विचार त्यांच्या ग्रंथांत झाला नाहीं. त्या सर्वांच्या देवदेवता आणि आचार यांचें पृथक्करण झालें नाहीं. आजचा सर्व पसारा वेदग्रंथांतून येतो असें धरलें आहे. तंत्रधर्म आणि दैवतमूलकधर्म पाहिलेच नाहींत. तरी त्यांचा ग्रंथ समतोल बुद्धीनें लिहीलेला असें मानलें जातें.

एकादा सिद्धांत आमच्या ग्रंथांत आल्यास अपसिद्धांत आणि त्यांच्या ग्रंथांत तोच सिद्धांत आल्यास तो संस्कृतीचें अंग असें तत्त्ववादीपक्षाच्या ब्रीदाला धरून पूर्ण निःपक्षपातीपणानें सांगितलें आहे. अशा सिद्धांताची एकजंत्री आम्ही दिली आहे.

नंतर आमच्यावर जे आक्षेप केले आहेत ते त्यांच्या त्या विषयांतील अज्ञानाचा परीणाम आहे हें दाखवितात. खरोखर येथें ग्रंथ संपावयाचा परंतु आमच्या सिद्धांतांशीं तीव्र मतभेद आहेत असें सांगून त्यांनीं जें वाईट वातावरण उत्पन्न केलें आहे त्याच्या निरासार्थ आमचे सिद्धांत पुनः सांगूं. त्यांच्यांशीं प्रो. चा तीव्र मतभेद असल्यास समाज काय समजावयाचें तें समजेल.

( १ ) संघोपसंघ हे सर्वंध जीवसृष्टीला व्यापून राहिले आहेत.

सं.
ता. ५७

( २ ) धार्मिक समाज हे ऐहिक समाजापेक्षां जास्त चिरंजीव असतात.

( ३ ) प्रगति ही आभासिक आहे.

( ४ ) नैतिक ध्येयें अलौकिक ( transcendental ) असावीं लागतात.

( ५ ) प्रगति दोन तत्त्वांवर अवलंबून असते, म्हणून तिचे चार पर्याय होतात.

( ६ ) जातिसंस्थाच समाजांना हितकारक.

( ७ ) गटांमध्यें वर्णनाशक आणि वंशदूषक असें वर्णव्यभिचार, अवेद्यावेदन, कर्मत्याग, उपदंश वगैरे दोषांचा फैलाव होतां कामा नये.

( ८ ) अर्थशास्त्रीय अन्नाची आणि धंद्यांची यथाप्रमाण विभागणी केली पाहिजे.

( ९ ) श्रेष्ठ प्रजेला आचारविचारांचे अत्यंत कडक नियम लावले पाहिजेत.

( १० ) समाजशास्त्राचे नियम चालीरीतींत रूढ करून ठेवले पाहिजेत.

( ११ ) वंशनाशक विषांचा फैलाव प्रजेमध्यें होऊं देतां कामा नये.

( १२ ) विवाहसंबंध स्थिर आणि शुद्ध राखणें ( यांशीं तर प्रो. साहेबांचा तीव्र मतभेद नसेल ना ! ).

( १३ ) शांतताप्रधान संस्कृति श्रेष्ठ.

( १४ ) समाजांत आत्महत्यांचें प्रमाण वाढणें इष्ट नाहीं.

( १५ ) समाजांत वेड लागण्याचें प्रमाण वाढणें इष्ट नाहीं.

( १६ ) समाजांत उपदंश, परमा वगैरे रोग वाढणें इष्ट नाहीं.

( १७ ) समाजांत घटस्फोटांचें प्रमाण वाढणें इष्ट नाहीं.

( १८ ) स्त्रीविवाह ऋतुप्राक् व्हावयास पाहिजे.

( १९ ) विवाह आमरण असावा.

( २० ) चालू पद्धतीचें स्त्रीशिक्षण अहितकारक आहे.

( २१ ) अस्पृश्यता हा समाजविभागणीचा आणि समाजविकासाचा नैसर्गिक परीणाम आहे.

( २२ ) वर्णांतर हें हानिकारक आहे.

( २३ ) संस्कारपालन हें अत्यंत आवश्यक आहे.

आमच्या ग्रंथांतील कांहीं सिद्धांत दिले आहेत. त्यांपैकीं कोणत्याशीं मतभेद आहे आणि तो कां आहे हें त्यांनीं सकारण सांगावें अशी त्यांना विनंती आहे. शेवटीं

'अणुरप्युपहन्ति विग्रहः प्रभुमन्तः प्रकृतिप्रकोपजः ।
अखिलं हि हिनस्ति भूधरं तरुशाखान्तनिघर्षजोऽनलः ॥

हा सिद्धांत लक्षांत ठेवून धर्मरक्षणाकरितां प्रो. काण्यांनीं आम्हाला येवून मिळावें अशी त्यांना हात जोडून विनंती आहे. आमच्या लिखाणांत कठोर शब्द येत असल्यास ते अंतःकरणाच्या तळमळीनें येतात, तरी त्याची गुरुवर्यांनीं माफी करावी.

REFBK-0005231

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ५२३१